POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२४९ ● मुंबई, शुक्रवार, ११ एप्रिल २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## आश्रय ट्रस्टच्या वतीने निफाड येथे थॅलेसेमिया जनजागृती व रक्ततपासणी शिबिर संपन्न



**■निफाड। प्रतिनिधी :**

दिनांक १० एप्रिल २०२५ रोजी आश्रय ट्रस्टच्या वतीने श्रीराम क्लासेस, निफाड येथे भव्य थॅलेसेमिया जनजागृती व रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थी व पालक मिळून हजारोंच्या संख्येने सहभाग नोंदवला.या शिबिराचे उत्कृष्ट नियोजन ट्रस्टचे कार्यकर्ते श्री. उल्हास दिगंबर पाटील व सौ. सविता पाटील यांनी केले.या कार्यक्रमात थॅलेसेमिया या गंभीर रक्तविकाराविषयी जागृती निर्माण करण्यासाठी प्रा. प्रकाश पांगम यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्याचप्रमाणे आश्रय ट्रस्ट च्या या उपक्रमात डॉ. प्राजक्ता जठार यांनी सहभाग घेतला व मोफत डोळे तपासणी तसेच मोफत चष्मा वाटप केले आहे.

त्याच प्रमाणे या श्रीराम क्लासेस मध्ये अनेक मुलांनी शालांत परीक्षेत चांगली कामगिरी बजावल्याबद्दल विद्यार्थ्यांना आश्रय ट्रस्टच्या वतीने प्रशस्तीपत्र देण्यात आले. यावेळी निफाड पत्रकार संघाचे अध्यक्ष व जिल्हाध्यक्ष राजेंद्र थोरात आणि सहाय्यक जिल्हा सरकारी वकील श्री.रामनाथ शिंदे हे देखील उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना आरोग्याविषयी प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले.

या शिबिरात डॉ. सुचिता गंधे, प्रा. दीपाली सूर्यवंशी, श्री. रवींद्र कुलकर्णी, सचिन साहेबराव मोरे यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात सर्व शिक्षक वृंद रमेश सोनजे, ऋषिकेश जगताप, प्रतीक रोकडे, योगेश नागरे, रूपाली नागरे, शितल मगर, शितल कुंदे, मीनाक्षी भिल्लोरे, शितल पाटील,दिपाली देशमुख अंकिता ढोमसे, अर्चना कराड आणि अर्चना कापसे यांची महत्वाची भूमिका होती. कार्यक्रमास मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक असून, थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्राच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल म्हणून हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

हा कार्यक्रम निफाड एज्युकेशन फाउंडेशनने, आश्रय सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट, ठाणे व ए. के डायग्नोस्टिक यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाला.











## शरद पवार कालही दैवत होते आणि आजही दैवत

### अजित पवारांच्या विधानाने भुवया उंचावल्या, काका-पुतण्यामध्ये चाललंय काय?



राष्ट्रवादीच्या फुटीनंतर शरद पवार आणि अजित पवार यांच्यात मोठा राजकीय सामना पाहायला मिळाला. पवार काका पुतण्याने एकमेकांवर टीकास्त्र डागण्याची एकही संधी सोडली नाही. मात्र मागील काही दिवसांपासून अजित पवारांनी शरद पवारांवर काहीसं प्रेम आल्याचं दिसत आहे. बुधवारी पिंपरी चिंचवडमध्ये झालेल्या एका कार्यक्रमात शरद पवार हे आपले दैवतच असल्याचं अजित पवार यांनी म्हटलं आहे. शरद पवार हे काल ही दैवत होते आणि त्यांना आजही दैवत मानतो असं विधान अजित पवारांनी केलं आहे.

**■मुंबई। प्रतिनिधी :**

राष्ट्रवादीच्या फुटीनंतर शरद पवार आणि अजित पवार या काका-पुतण्यामध्ये मोठं राजकीय वितुष्ट आल्याचं पाहायला मिळालं. लोकसभा आणि विधानसभेला तर पवार विरुद्ध पवार थेट सामना पाहायला मिळाला. मात्र आता अजित पवारांनी शरद पवारांबाबत एक मोठं वक्तव्य केलं आहे. शरद पवार हे कालही दैवत होते आणि आजही दैवत असल्याचं अजित पवारांनी म्हटलं आहे. त्यामुळे पवार काका-पुतण्यामध्ये चाललंय काय असा प्रश्न पडला आहे.

आपले काका चांगले आहेत हे म्हणण्याशिवाय आता त्यांच्याकडे पर्याय नसल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या प्रवक्त्या विद्या चव्हाण यांनी अजित पवारांना टोला लगावला आहे. अजित पवारांनी काका आपले दैवत आहेत. काकांची पुण्याई आपल्या मागे आहे असं म्हटलेलं आहे. म्हणजे अजितदादांमागे काकांची पुण्याई आहे हे स्पष्ट असल्याचं कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे.

अजित पवार यांना मागील काही दिवसांपासून काका शरद पवारांच्या प्रेमाचा उमाळा आल्याचं दिसत आहे. पिंपरी-चिंचवडच्या आधी अजितदादांनी बीडच्या कार्यक्रमातही आई-वडिल आणि चुलत्याच्या आशिवार्दाने आपलं चांगलं चालल्याचं वक्तव्य केलं होतं.

राष्ट्रवादीच्या फुटीनंतर पवार काका पुतण्यामध्ये कुरघोडीचं राजकारण पाहायला मिळालं होतं. मात्र लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीनंतर वातावरण बदललं आहे. शरद पवारांच्या वाढदिवसादिवशी अजित पवारांनी दिल्लीतील निवासस्थानी सहकुटुंब जात पवारांना शुभेच्छा दिल्या होत्या. त्यानंतर बीडमधील चुलत्याचा आशिर्वाद आणि आता पिंपरी-चिंचवडमधील पवार कालही दैवत आणि आजही ही अजित पवारांची वक्तव्य खूपच बोलकी आहेत.

## भगवती रुग्णालयाच्या खासगीकरणाचा घाट

### खासगीकरणाविरोधात मनसे रस्त्यावर

**■मुंबई। प्रतिनिधी :**

बोरिवली येथील मुंबई महापालिकेच्या भगवती हॉस्पिटलच्या खासगीकरणाचा घाट घालण्यात आला आहे. मात्र, भगवती रुग्णालयाच्या खासगीकरणाला तीव्र विरोध करण्यात आला आहे. शिवसेना ठाकरे पक्षासह महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनंही भगवती रुग्णालयाच्या खासगिकरणाला तीव्र विरोध केला आहे. तर मनसे खासगीकरणाविरोधात रस्त्यावर उतरली होती.

मुंबई महानगर पालिकेचं बोरिवलीमध्ये असलेलं भगवती रुग्णालय हे सर्वसामान्य मुंबईकर रुग्णांचा आधार आहे. मात्र, भगवती रुग्णालयाच्या खासगीकरणाचे प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. रुग्णालयाच्या खासगीकरणाला तीव्र विरोध होतो आहे. भगवती हॉस्पिटल खासगीकरणा विरोधात मनसे आता मैदानात उतरली आहे. भगवती हॉस्पिटलचे खाजगीकरण होऊ नये याबाबत मनसेच्या वतीने आज रुग्णालयाबाहेर आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मुंबई शहर अध्यक्ष संदीप देशपांडे उपस्थित होते. दरम्यान कोणताही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून रुग्णालयाबाहेर सकाळपासूनच पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.




**भगवती हॉस्पिटलच्या खाजगीकरणाला मनसेचा विरोध**

भगवती रुग्णालयाच्या खासगीकरणाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने देखील विरोध केला आहे. भगवती रुग्णालयाचं खासगीकरण करू नये अशी मागणी ठाकरे गटाने केली आहे. तर याच मागणीसाठी महाविकास आघाडीचे नेते आणि विधानपरिषद विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, सुभाष देसाई यांनी मुंबई पालिका आयुक्तांची भेट घेत खासगीकरणाला विरोध केला आहे. मुंबईतल्या सर्वसामान्य रुग्णांचा आधार असलेलं भगवती रुग्णालयाच्या खासगीकरणाचा घाट का घातला जातोय हे न उलगडलेलं कोडं आहे. मात्र, या खासगीकरणाला मोठ्या प्रमाणावर विरोध करण्यात आला आहे. आता पालिका प्रशासन काय निर्णय घेतं ते पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

जर भगवती रुग्णालयाचे खासगीकरण झाले तर पैसे काही लोकांच्या खिश्यात जाणार आहेत. मग याचा आपल्या लोकांना काही फायदा होणार नाही. महानगर पालिका हे बरोबर काम करत नाही. त्यामुळे आम्ही भगवती रुग्णालयाच्या खासगीकरणाला तीव्र विरोध करत आहोत. हा निर्णय रद्द करावा. जो पर्यंत आम्ही येथे आहोत तो पर्यंत भगवती रुग्णालयाचे खासगीकरण होणार नाही. आम्ही प्राण देऊ पण खासगीकरण होऊ देणार नाही असं मनसे नेते संदीप देशपांडे यांनी म्हटलं.

## पुण्यातील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलवर सर्वात मोठी कारवाई

### २ दिवसात २२००६७६०८१ रुपये भरले नाही तर...

**■पुणे। प्रतिनिधी :**

गर्भवती महिलेच्या मृत्यूनंतर दीनानाथ मंगेशकर रुग्णालय वादातत सापडले आहे. दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलवर सर्वात मोठी कारावाई करण्यात आली आहे. पुणे महापालिकेकडून दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला नोटीस बजावण्यात आली आहे. २ दिवसांत पैसे भरण्याची सूचना महापालिकेनं दीनानाथ रुग्णालयाला बजावली आहे. २२ कोटी ६ लाख ७६ हजार ८१ रुपयांची थकबाकी तात्काळ भरण्याचे आदेश पुणे महापालिकेनं नोटीसीतून दिले आहेत. पत्र मिळाल्यापासून दोन दिवसांच्या आत थकबाकी भरायचे आदेश या नोटीस मध्ये देण्यात आली आहे. थकबाकी न भरल्यास जप्तीची कारवाई करण्याचे आदेश.

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातल्या तनिषा भिसे प्रकरणात आज आणखी दोन अहवाल येणार आहेत.... उपसंचालक आरोग्य सेवा पुणे यांचा अहवाल काल आला ज्यात रुग्णालयाला दोषी ठरवण्यात आलं.रुग्णाला उपचार देण्यात रुग्णालयाने हलगर्जीपणा केल्याचंही नमूद करण्यात आलंय... आज माता मृत्यू अन्वेषण चौकशी समिती आणि धर्मदाय चौकशी समिती यांचा अहवाल येणं बाकी आहे. आज हे दोन्ही अहवाल येण्याची शक्यता आहे. या तिनही अहवालानंतर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.




पैशांमुळे योग्य वेळेत उपचार न मिळाल्याने गर्भवती महिला तनिषा भिसे यांच्या मृत्यूप्रकरणी पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर ठपका ठेवण्यात आलाय.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी या प्रकरणाची संपूर्ण माहिती दिली. पेशंटसमोरच १० लाखांची मागणी करण्यात आल्याचं चाकणकर यांनी सांगितलं. रुग्ण तब्बल साडेपाच तास रुग्णालयात होती. यावेळी रक्तस्त्राव सुरु असतानाही उपचार करण्यात आले नाहीत असं चाकणकरांनी म्हटलंय. याप्रकरणी शासकीय अहवालानंतर आणखी दोन अहवाल येणार आहेत. या तिन्ही अहवालानंतर कारवाई करणार असल्याचं चाकणकरांनी सांगितलं. या प्रकरणात दीनानाथ रुग्णालयाचा हलगर्जीपणा असल्याचंही चाकणकरांनी नमूद केलंय.

## पुढील २४ तासात राज्यात सूर्य आग ओकणार

### विदर्भात मात्र अवकाळीचा मारा




**■मुंबई। प्रतिनिधी :**

केंद्रीय हवामानशास्त्र विभागानं दिलेल्या माहितीनुसार १० एप्रिल रोजी देशाच्या विविध राज्यांमध्ये हवामानाची वेगवेगळी स्थिती पाहायला मिळेल. राजच्यातील दक्षिणेकडे कमी दाबाचा पट्टा आणि तीव्र वाऱ्याचं क्षेत्र तयार होत असतानाच राजस्थान, दिल्ली, मध्य प्रदेश मात्र उष्णतेची लाट अधिक तीव्र होताना दिसेल. पुढील २४ तासांमध्ये आयएमडीनं दक्षिण भारतामध्ये पावसाचा इशारा जारी केला असून, मध्य आणि उत्तर भारतामध्ये मात्र तापमानात वाढ अपेक्षित असेल असं सांगितलं आहे. इथं महाराष्ट्रात उष्णतेमुळं होणारी होरपळ अद्याप थांबलेली नाही. राज्यातील विदर्भ क्षेत्रावर सूर्यकिरणांचा तीव्र मारा सातत्यानं सुरू असून, त्यामुळं नजीकच्या भागांमध्येही या उष्णतेच्या झळा पोहोचू लागल्या आहेत. मराठवाडा, मध्य महाराष्ट्रासह पश्चिम महाराष्ट्रातही हीच स्थिती पाहायला मिळत आहे. राज्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद अकोला इथं करण्यात आली असून, हा आकडा ४४.१ अंश सेल्सिअस इतका असल्याची नोंद करण्यात आली. एकिकडे उष्णता गंभीर रुप धारण करत असतानाच याच कारणास्तव बाष्पीभवन प्रक्रियेला वेग येत असून, त्यामुळं वादळी पावसासाठी पूरक वातावरणनिर्मिती होताना दिसत आहे. ज्यामुळं विदर्भात पुढील २४ तासांसाठी वादळी अवकाळी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. राज्याच्या इतर भागांमध्ये आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यतासुद्धा वर्तवण्यात आली आहे.


## परीक्षांचे वेळापत्रक बदला... न्यायालयाचे शाळांना आदेश

### तडकाफडकी निर्णय घेण्यामागचं कारण काय?

**■नागपूर। प्रतिनिधी :**

राज्यातील तापमान ४४ अंशावर पोहोचलं आहे. तापमानाचा वाढता पारा पाहता न्यायालयाने शाळांना आदेश दिले आहेत. वाढलेले तापमान पाहता विदर्भातील शाळांच्या परीक्षा लवकर घेण्याचे आदेश नागपूर खंडपीठाने संबंधित जिल्ह्यातील शिक्षणाधिकाऱ्यां दिले आहे. शिक्षणाधिकाऱ्यांनी शिक्षण विभागाच्या वरिष्ठांची परवानगी घेऊन वेळापत्रक ठरवावे अशी माहिती दिली आहे.

मात्र विदर्भातील तीव्र ऊन आणि वाढलेला तापमान पाहता शिक्षण विभागाच्या संपूर्ण राज्यात एकाच दिवशी एकाच वेळी परीक्षा घेण्याच्या शिक्षण विभागाच्या निर्णयाला विदर्भातील शाळांनी तीव्र विरोध दर्शविला होता. शिक्षण मंत्र्यांना पत्र पाठवण्यात आले होते. सोबतच उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठात याची काही दाखल करण्यात आली होती... काल संध्याकाळी उशिरा या संदर्भात न्यायालयात सुनावणी झाली असून न्यायालयाने विदर्भातील सर्व जिल्ह्यातील शिक्षण अधिकाऱ्यांनी शिक्षण विभागाची परवानगी घेऊन विदर्भातील शाळांसाठी परीक्षेच्या वेळापत्रकात आवश्यक बदल करावे असे निर्देश दिले आहे.




संपूर्ण राज्यात एकाच दिवशी एकाच वेळेस परीक्षा घेण्यासंदर्भात शिक्षण विभागाने या वर्षी निर्णय घेतला होता. त्यामुळे आजवर एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत विदर्भातील शाळांच्या परीक्षा संपत असताना, यावर्षी शिक्षण विभागाच्या निर्णयामुळे विदर्भातील शाळांच्या परीक्षा एप्रिल अखेरपर्यंत लांबणार आहेत.

महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाने न्यायालयाच्या निर्देशांचा स्वागत करत विदर्भातील शिक्षण अधिकाऱ्यांनी त्वरित निर्णय करून विदर्भातील शाळांच्या परीक्षेच्या वेळापत्रकात सुधारणा करावी अशी मागणी केली आहे.. विदर्भातील तीव्र ऊन आणि वाढलेले तापमान लक्षात घेता १५ एप्रिल च्या पूर्वी विदभार्तील शाळांच्या परीक्षा घेण्यात याव्या अशी मागणी ही महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाने केली आहे.

## नेपाळच्या तरुणीला पालघरमध्ये संपवले... वाटाण्याच्या गोणीने उलगडले रहस्य

**■नाशिक। प्रतिनिधी :**

नेपाळच्या तरुणीची पालघरमध्ये हत्या करण्यात आली आहे. प्रियकर आणि त्याच्या वडिलांनीच तरुणीची हत्या केल्याचे समोर आले आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणात पोलिसांनी तिघांना अटक केली असून एक आरोपी नेपाळमध्ये पळून गेला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तरुणीचे आणि आरोपीचे प्रेमसंबंध होते. दोघंही नेपाळमध्ये लिव्ह-इन-रिलेशनशिपमध्ये राहत होते. काही दिवसांपूर्वी शिमला मार्गे ते महाराष्ट्राच्या सीमेवर असलेल दादरा नगर हवेली येथे पोहोचले. त्यानंतर तिथे एका साथीदाराच्या मदतीने मनोर त्र्यंबक मार्गावर मोखाडा जवळ रात्री बारा वाजताच्या सुमारास या तरुणीची ओढणीने गळा आवळून हत्या करत मृतदेह पुलाखाली फेकला होता. मटारच्या गोणीत मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली होती.

पोलिसांनीदेखील मटारच्या गोणीत मृतदेह आढळून आल्याने पालघर पोलिसांनी चक्र फिरवली असून एस एल २८ या गोणी वरील मार्क वरून आरोपींचा छडा लावण्यात पालघर पोलिसांना यश आलं आहे. विशेष म्हणजे मटार पार्सल करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या गोणीवरून पोलिसांना या हत्त्येचा छडा लावला आहे.

मयत तरुणी हिने लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहिल्यानंतर तिने प्रियकरासमोर लग्नाचा तगादा लावला होता. यालाच कंटाळून प्रियकराने आपले वडील आणि एका साथीदाराला सोबत घेत प्रेयसीचा काटा काढला असून या प्रकरणात पालघर पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. तर आणखीन एक आरोपी पुन्हा नेपाळमध्ये पसार झाला असून त्याचा शोध सध्या पालघर पोलिसांकडून घेतला जातोय.

**भूतानच्या तरुणीवर पुण्यात सामूहिक बलात्कार**

2020 पासून पुण्यात वास्तव्यास असलेल्या भूतानच्या महिलेवर 7 जणांनी लैंगिक अत्याचार केला. राष्ट्रवादीचा माजी पदाधिकारी शंतनु कुकडे याच्यासह त्याच्या मित्रांना अटक केली आहे. कुकडे याच्यावर काही दिवसांपूर्वी 2 तरुणींचा लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे. याप्रकरणी पीडित तरुणीने समर्थ पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. यावरून शंतनु कुकडे यासह ऋषिकेश नवले, जालिंदर बडदे, उमेश शहाणे, प्रतीक शिंदे, अॅड विपीन बिडकर, सागर रासगे, अविनाश सूर्यवंशी आणि मुद्दासीन मेनन यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणी पोलिसांनी 7 जणांना अटक केली आहे



## आईच्या प्रियकरानेच ६ वर्षीय चिमुकलीवर केला अत्याचार

**■ जालना। प्रतिनिधी :**

जालना शहरात अत्यंत निंदनीय घटना घडली आहे. एका विभक्त महिलेने आपल्या मुला मुलीला बापाचे नाव लागावे, मुलं मोठी झाल्यावर समाजात वावरत असताना आपल्या मुलाकडे कोणी वाकड्या नजरेने पाहिले नाही पाहिजे. मुलांनी विचारले तर आमचा बाप कोण तर ते दाखवता आलं पाहिजे, अशा विचाराने ती महिला प्रशांत वाडेकरसोबत लिव इन रिलेशनशिप मध्ये राहत होती. पण तिने स्वप्नात देखील विचार केला नसेल, असे घृणास्पद कृत्य तिच्या प्रियकराने केले आहे.

सदर महिला साडेतीन वाजेपर्यंत कामानिमित्त घराबाहेर असते. तर वाडेकर हा दिवसभर घरी राहून रात्री ०७:३० वाजेनंतर हॉटेलमध्ये ड्युटीवर जातो. शनिवारी ५ एप्रिलला प्रशांत वाडेकरने त्याची प्रेयसी घरी नसताना तिच्या ६ वर्षीय मुलीसोबत आधी अनैसर्गिक कृत्य केले आणि त्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार देखील केला.

**काय आहे घटनाक्रम**

परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यातील एक २८ वर्षीय महिला पतीपासून विभक्त झालेली असून ती जुना जालना भागात भाड्याच्या खोलीत राहते. तिला पहिल्या पतीपासून तीन मुली व एक मुलगा झालेला असून त्यापैकी एक मुलगा व एक मुलगी पतीकडे जिंतूर येथे राहतात. तर एक ६ वर्षीय व दुसरी ४ वर्षीय मुलगी तिच्याकडे राहत. ही महिला साफसफाई आणि घरगुती काम करून तिचा व मुलींचा उदरनिर्वाह करत होती. दोन वर्षांपूर्वी तिची एका हॉटेलमध्ये मॅनेजर म्हणून काम करणाऱ्या प्रशांत प्रकाश वाडेकर याच्याशी ओळख झाली होती. तेव्हापासून ती महिला आणि वाडेकर हे दोघे दोन वर्षांपासून भाड्याच्या खोलीत लिव्ह इनमध्ये राहत होते.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# राज्यपालांच्या एजंटगिरीला चाप

केंद्रातील सत्ताधाऱ्यांच्या आशीवार्दाने घटनात्मक पदावर वर्णी लावून त्यांच्याच इशाऱ्याने राज्यातील सत्तार्धायांना त्रास देण्याचे काम करणाया राज्यपालांना सर्वोच्च न्यायालयाने चांगलाच दणका दिला आहे. तामिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी यांनी राज्य सरकारने मंजूर केलेली १० विधेयके अडवून ठेवली होती. राज्यपालांची ही कृती असंवैधानिक असल्याचे नमूद करत सर्वोच्च न्यायालयाने आर.एन. रवी यांच्यावर चांगलेच ताशेरे ओढले आहेत. सत्ताधाऱ्यांनी मंजूर केलेल्या विधेयकांवर कुठलाही निर्णय न घेता राज्यपालांकडून ती विधेयके राजकीय हेतूने प्रलंबित ठेवण्याचे प्रकार आजकाल खूपच वाढत आहेत. महाराष्ट्रात तत्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या सत्ताकाळातील राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, पश्चिम बंगालमध्ये तत्कालीन तृणमूल काँग्रेस सरकारच्या सत्ताकाळात तत्कालीन राज्यपाल जगदीप धनखड आणि दिल्लीत तत्कालीन आम आदमी पक्षाच्या सत्ताकाळातील नायब राज्यपाल व्ही.के. सक्सेना यांनीही असे उपद्व्याप केले होते. ज्यामुळे राज्य सरकार आणि राज्यपालांमध्ये सातत्याने कुरबुरी सुरू असायच्या. महाराष्ट्रात विधान परिषदेच्या राज्यपाल नियुक्त आमदारांची यादी राज्य सरकारकडून मिळूनही भगतसिंह कोश्यारी या यादीवर तब्बली दीड वर्षांहून अधिक काळ मांडी घालून बसले होते. मुंबई उच्च न्यायालयाने कठोर शब्दात सुनावूनही कोश्यारी कान पाडून गप्प होते. यादीवर निर्णय घेण्यासाठी संविधानाने कुठलीही कालमर्यादा आखून दिलेली नसल्याने राज्यपालांनी आपल्या विवेकबुद्धीचा वापर करुन निर्णय घेणे अपेक्षित होते. याच पळवाटेचा गैरफायदा कोश्यारींनी उचलला आणि अखेरपर्यंत या यादीवर निर्णय झालाच नाही. मविआचे सरकार पाडण्यात आणि महायुतीचे सरकार स्थापन करण्यात भगतसिंह कोश्यारींच्या असंवैधानिक कृतीची कशी मदत झाली, याचे दाखले तर खुद्द सर्वोच्च न्यायालयानेच दिले आहेत. तरीही या घटनात्मक पदाचा दुरुपयोग सुरूच आहे. राष्ट्रपती जसे राष्ट्राचे प्रमुख असतात, त्याचप्रमाणे राज्यपाल हे राज्याचे प्रमुख असतात. राष्ट्रपती वेगवेगळ्या राज्यांमध्ये राज्यपालांची नियुक्ती करत असले, तरी ही नियुक्ती केंद्राच्या सल्ल्यानुसार होत असल्याने राज्यपालांच्या राजकीय तटस्थतेवर आणि निष्पक्षतेवर सुरूवातीपासूनच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आले आहे. याआधीही काँग्रेस वा आघाडी सरकारच्या काळात राज्यपालांच्या भूमिकेवर आक्षेप घेण्यात येत होते, तीच परिस्थिती भाजपप्रणित एनडीए सरकारच्या काळातही सुरू आहे. राज्यपालांना संविधानानुसार विविध भूमिका आणि अधिकार आहेत, जसे की राज्य विधिमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकांना मान्यता देणे, मुख्यमंत्री आणि इतर मंत्र्यांची नियुक्ती करणे, राष्ट्रपतींना राज्यातील परिस्थितीबद्दल अहवाल पाठवणे आणि काही राज्यांमध्ये विशेष जबाबदाऱ्या बजावणे. मात्र, या भूमिका आणि अधिकार बहुतेकदा राज्यपालांच्या विवेकबुद्धीच्या अधीन असल्याने या भूमिका बजावताना निवडून आलेल्या राज्य सरकारशी त्यांचा संघर्ष होतो. यामागचे कारणही स्पष्ट आहे, विरोधी पक्षाचे सरकार असलेल्या राज्यात लक्ष ठेवण्यासाठी किंवा राजकीय गुंतागुंत निर्माण करण्याच्या उद्देशानेच त्यांना केंद्राकडून पाठवलेले असते. त्यामुळे बहुतांश राज्यपाल हे केंद्र सरकारचे एजंट म्हणून काम करीत असतात. परिणामी त्यांचा आणि सत्ताधाऱ्यांचा उघड संघर्ष सुरू असतो. तामिळनाडूमध्येही काही वेगळे सुरू नव्हते. राज्यपाल आर. एन. रवी यांनी तामिळनाडू सरकारची १० विधेयके अडवून ठेवली होती. यातील सर्वात जुने विधेयक जानेवारी २०२० चे आहे. त्यातही महत्त्वाचे म्हणजे यातील अनेक विधेयकांना विधानसभेने पुन्हा मंजुरी देऊन राज्यपालांकडे पाठविले होते. राज्यपालांनी परत पाठवलेल्या विधेयकावर विधानसभेने पुनर्विचार करून ते विधेयक दुसऱ्यांदा राज्यपालांकडे पाठविल्यानंतर त्याला मान्यता द्यावीच लागते. पहिल्या विधेयकापेक्षा दुसरे विधेयक वेगळे असेल तरच अपवाद म्हणून त्याकडे पाहता येते. मात्र, तरीही राज्यपालांनी दीर्घकाळ या विधेयकांवर निर्णय घेतला नाही. ही विधेयके राष्ट्रपतींच्या विचारार्थ पाठविणार असल्याचे कारण राज्यपाल रवी सातत्याने देत राहिले. राज्यपालांची ही कृती बेकायदेशीर आणि कायद्याचे उल्लंघन असल्याचे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश. जे. बी. पारदीवाला आणि न्यायाधीश. आर. महादेवन यांच्या खंडपीठाने म्हटले आहे. तसेच राज्यपालांकडे दुसऱ्यांदा विधेयके सादर केल्याच्या तारखेपासून ही विधेयके मंजूर झाल्याचे मानले जाईल, असेही खंडपीठाने स्पष्ट केले आहे. लोकशाहीत आमदारांना जनतेने निवडून दिलेले असते. त्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या अधिकारावर राज्यपाल अतिक्रमण करू शकत नाहीत. संविधानात कालमर्यादेचा उल्लेख नसला तरी राज्यपाल अनंत काळासाठी विधेयकांना अडकवून ठेवू शकत नाहीत. विधेयके अडवण्याचा कोणताही विशेष अधिकार राज्यपालांकडे नाही. संविधानानुसार त्यांना सत्ताधाऱ्यांच्या सल्ल्याने काम केलेच पाहिजे. राज्यपालांनी संसदीय लोकशाहीच्या परंपरांचा आदर राखून वागले पाहिजे. जनतेने निवडून दिलेल्या सरकारचा आदर राखायला हवा. राज्यपालांनी मित्र, तत्त्वज्ञ या नात्याने संविधानाद्वारे घेतलेल्या शपथेद्वारे आपली भूमिका पार पाडणे अपेक्षित आहे, प्रत्यक्षात राज्य सरकारने पारित केलेली विधेयके रोखून ठेवण्याची राज्यपालांची कृती म्हणजे विधानसभेचा गळा दाबण्यासारखीच आहे. राज्य सरकारचे अधिकार कमकुवत होतील, अशा निर्णयांना आम्ही समर्थन देणार नाही, असे तामिळनाडूच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. मुंबई उच्च न्यायालयानेही कोश्यारींच्या घटनाबाह्य कृतीवर वेळीच निर्णय दिला असता, तर कदाचित महाराष्ट्रात राजकीय सत्तासंघषार्ची वेळ आली नसती. असो. सर्वोच्च न्यायालयाने तरी तामिळनाडूच्या राज्यपालांच्या एजंटगिरीला वेळीच चाप लावला, हेही नसे थोडके.

# आरोग्याचा बाजार मांडलाय!



**'रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा' हे शब्द आता ऐकीवातच चांगले वाटतात. 'खिशात पैसा तरच उपचार' असा कारभार बहुतांश सगळयाच रुग्णालयांत सर्रास सुरू आहे. प्रसूतीसाठी आलेल्या महिलेला पैसे भरा तरच दाखल करून घेणार, असा प्रकार पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात घडला. रुग्णालयाच्या बेजबाबदारपणामुळे महिलेला जीव गमवावा लागला, अशी संतापजनक घटना दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात घडली.**

पैशांअभावी उपचारास नकार ही दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील पहिलीच घटना आहे असे नाही, तर पैशांअभावी उपचारास नकार दिल्याच्या घटना याआधी देखील उघडकीस आल्या आहेत. त्यामुळे रुग्ण सेवेच्या नावाखाली 'आरोग्याचा बाजारच मांडला' आहे.

सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्यातील दीनानाथ मंगेशकर या धमार्दाय नोंदणी असलेल्या रुग्णालयातच रुग्णसेवेला तडा गेला आहे. गर्भवती महिलेवर वेळीच उपचार न केल्याने तिचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात घडली. 'एका गर्भवती महिलेला उपचारासाठी दाखल करण्याआधी १० लाख रुपये भरा, त्यानंतर दाखल केले जाईल', असा संतापजनक प्रकार पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात घडला. वेदना सहन होत नसल्याने महिलेला प्रसूतीसाठी अन्य रुग्णालयात दाखल केले; मात्र महिलेने दोन जुळ्या मुलींना जन्म दिला आणि महिलेचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घटनेची गंभीर दखल घेत चौकशीचे आदेश जारी केले. चौकशी होणार, लहान माशांवर कारवाई होणार, काही दिवसांनी सगळे काही शांत आणि दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचा कारभार पुन्हा सुरळीत सुरू होणार; मात्र त्या दोन जुळ्या मुलींची काय चूक? आईने जन्म दिला आणि आईचे तोंड बघण्याचे सुख मुलींच्या आयुष्यात नाही! ही खंत आयुष्यभर त्या दोन्ही मुलींच्या मनात घर करून राहणार.

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात घडलेल्या घटनेनंतर राज्यातील राज्यकर्त्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत यापुढे असा प्रकार घडणार नाही, यासाठी कठोर पाऊल उचलणे गरजेचे आहे, अन्यथा अशा घटना घडणार, चौकशीचे आदेश पारित होणार आणि निष्पाप लोकांचा जीव जाणार. रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक रुग्णावर योग्य उपचार करणे रुग्णालय प्रशासनाची जबाबदारी असून, रुग्णांच्या जीवाशी खेळ करणाऱ्यांवर कठोर कारवाईसाठी कठोर कायदा अंमलात आणणे गरजेचे आहे, अन्यथा पैशांसाठी रुग्णांचा जीव कवडीमोलाचा, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

भंडारा जिल्हा रुग्णालयातील शिशू केअर सेंटरमध्ये अग्निभडका उडाला आणि १० निष्पाप चिमुकल्यांचा जीव गेला. भांडुप येथील ड्रीम मॉलमध्ये अग्निभडका उडाला आणि ११ निष्पाप लोकांचा बळी गेला. या घटनेनंतर चौकशीचे आदेश, काही दिवस ओरड नंतर सगळं शांत. खासगी रुग्णालय असो वा सरकारी रुग्णालय; रुग्णालयात घडणारे असे धक्कादायक प्रकार यामुळे वैद्यकीय व्यवस्थेवर आणि सुविधांवर प्रश्न चिन्ह उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

रुग्णालयात घटना घडली की, चौकशी समिती स्थापन, दोषींवर कारवाई असा सगळा घटनाक्रम बघायला मिळतो. परंतु भविष्यात अशी घटना होऊ नये यासाठी वरिष्ठ अधिकारी, राजकीय नेत्यांनी लक्ष घालणे गरजेचे आहे, अन्यथा काही बेजबाबदार आणि असंवेदशील रुग्णालयांमुळे अशा घटना वारंवार घडतच राहणार, हेही तितकेच खरे.

राज्यात विश्वस्त रुग्णालयांसाठी भूखंड देताना रुग्णालयातील ३९ टक्के खाटा (बेड) हे गरीब रुग्णांसाठी आरक्षित करण्याची अट घालण्यात आली आहे; मात्र ज्यावेळी लोकप्रतिनिधी गरीब रुग्णांसाठी या खाटा उपलब्ध करून देण्यासाठी रुग्णालयांकडे संपर्क करतात, त्यावेळी खाटा उपलब्ध नसल्याचे सांगितले जाते, असा अनुभव लोकप्रतिनिधींना आला आहे. त्याचबरोबर आरक्षित जागांवर बोगस रुग्ण दाखवून सरकारकडून खासगी रुग्णालये पैसे उकळतात. त्यामुळे धर्मदाय रुग्णालयावर नियंत्रण आणणे काळजी गरज बनली आहे.

सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रातून येणाऱ्या नकारात्मक आणि दुःखद घटना नित्याच्या होणे, हे आरोग्य व्यवस्थेचे अपयशच. महाराष्ट्रात नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर येथे सरकारी रुग्णालयांत घडलेल्या मृत्यू तांडवामुळे देशाला हेलावून टाकले. नांदेडमध्ये १६ नवजात बाळांसह ३१ जणांचा मृत्यू होणे, ही सामान्य घटना नाही.

राज्यातील बहुतांश शासकीय रुग्णालयांमध्ये हीच स्थिती आहे. सर्व शासकीय रुग्णालयांतील कमतरता दूर करण्यासाठी आणि डॉक्टरांच्या रिक्त जागा भरण्यासाठी पावले उचलणे गरजेचे आहे. रिक्त पदे भरणे, पुरेसा औषधसाठा उपलब्ध करणे, रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांबरोबर संयमाने वागणे याचे धडे देणे यावर राज्य सरकारने लक्ष केंद्रित करणे काळाची गरज बनली आहे.

### खासगीकरणावर लगाम!

राज्यातील सरकारी रुग्णालयात योग्य उपचार पद्धती यामुळे रुग्ण सरकारी रुग्णालयात उपचारासाठी दाखल होतात; मात्र सरकारी रुग्णालयात औषधांचा तुटवडा, रिक्त पदे यामुळे रुग्णालयाची आरोग्य व्यवस्था कोलमडली आहे. सरकारी रुग्णालये अधिक सक्षम करणे, रिक्त पदे भरणे यावर जोर देणे गरजेचे असताना खासगी कंत्राटदाराच्या हाती सरकारी रुग्णालयांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. खासगी सुरक्षारक्षक, कंत्राटी कामगार यामुळे सरकारी रुग्णालयाची प्रतिमा मलिन झाली आहे. त्यामुळे सरकारी रुग्णालयात रिक्त पदे कायमस्वरूपी भरणे यावर लक्ष केंद्रित करत खासगीकरणावर लगाम घालणे काळाची गरज बनली आहे.

# अंथरूण पाहून पाय पसरण्याचा साक्षात्कार

निवडणुकीच्या काळात मुक्त हस्ताने दिलेल्या आश्वासनांमधून गळ्यात पडलेल्या विजयाच्या हारतुऱ्यांचे आता पाश बनल्याचा अनुभव महायुतीच्या नेत्यांना येत आहे. लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींना दरमहा २१०० रुपये देण्याच्या विषयातून राज्य सरकारने नुकतीच 'सन्मानजनक' माघार घेतली; तीच वेळ शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत आली आहे. 'सध्या राज्याची आर्थिक स्थिती पाहता कर्जमाफी शक्य नाही, इतकेच नव्हे तर पुढील तीन वर्षे कर्जमाफी करता येणार नाही,' असे अर्थ खात्याची जबाबदारी पाहणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगून टाकले. पवार हे स्पष्ट आणि सडेतोड बोलण्यासाठी प्रसिद्ध आहेत. फक्त निवडणुकीपूर्वी त्यांचा हा सडेतोड बाणा कुठे हरवतो, हा प्रश्न आहे. निवडणुकीपूर्वी राज्यात त्यांचेच सरकार होते.

महायुतीच्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये देण्यापाठोपाठ शेतकरी कर्जमाफी, शेतकरी सन्माननिधीची रक्कम १५ हजार रुपये आणि किमान आधारभूत किमतीवर (एमएसपी) २० टक्के अनुदान, हे दुसऱ्या क्रमांकाचे आश्वासन आहे. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या त्रयीच्या छायाचित्रांसह हा वचननामा प्रसिद्ध झाला होता. तेव्हासुद्धा अर्थमंत्री असूनही मूग गिळून गप्प राहिलेल्या अजितदादांना निवडणुकीनंतर 'अंथरूण पाहून पाय पसरायचे असतात,' असा साक्षात्कार झाल्याचे दिसते. आता कर्जमाफीच्या विषयावरून निरनिराळ्या कोलांटउड्या मारणाऱ्या महायुतीच्या नेत्यांमध्ये सर्वात लक्षवेधी ठरले कृषिमंत्री



माणिकराव कोकाटे. शेतकऱ्यांशी संबंधित खात्याचे मंत्री असूनही 'शेतकरी कर्जमाफी हा विषय आपला नाहीच,' असे सांगून त्यांनी मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांकडे बोट दाखविले. इतकेच नव्हे, तर 'हा विषय आपण ऐकलाच नाही,' अशीही पुस्ती त्यांनी जोडली आहे. माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनाही असेच व्यासपीठावर शेजारी बसलेल्यांची वादग्रस्त वक्तव्ये ऐकू येत नसत, याची या निमित्ताने आठवण होते. राजकारणात हल्ली बोलताना तोंडावर ताबा नसला तरी खपून जाते; कानांवर मात्र कृषिमंत्र्यांसारखे नियंत्रण हवे!

राज्यात बळीराजाची अवस्था बिकट आहे, यात शंकाच नाही. एकीकडे खते-बियाणे, कीटकनाशके आणि कृषिसाहित्याचे दिवसेंदिवस वाढणारे दर, मजुरीच्या दरातील वाढ; तर दुसरीकडे वेगाने कोसळणारे पिकांचे भाव हे चित्र शेतकऱ्यांच्या पाचवीला पुजले आहे. वेळोवेळी येणाऱ्या नैसर्गिक आपत्ती अडचणींत भरच घालतात. नापिकी आणि कर्जबाजारीला कंटाळून राज्यात दररोज शेतकरी मरणाला जवळ करत आहेत. अशा वेळी त्याला दिलासा देण्यासाठी तातडीचे आणि दीर्घकालीन, अशा दोन्ही उपायांची गरज आहे. दीर्घकालीन उपायांमध्ये सिंचनाच्या व्यवस्था बळकट करणे, शेतीची उत्पादकता वाढवणे, खते-बियाण्यांसह नवे तंत्रज्ञान सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणणे, यांसह सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शेतीमालाला पुरेसा दर देणे अतिशय महत्त्वाचे आहे. तातडीच्या उपायांमध्ये कर्जमाफीचा पर्याय पूर्वीपासून काही अभ्यासकांकडून मांडला जातो. यापूर्वी सन १९९० मध्ये व्ही. पी. सिंह सरकारने दिलेली माफी, त्यानंतर सन २००८ मध्ये संयुक्त पुरोगामी सरकारने दिलेली ७१ हजार कोटी रुपयांची सर्वात मोठी कर्जमाफी, यांबरोबरच देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना आणि नंतर उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात अशा मोठ्या कर्जमाफी योजना झाल्या. त्यातून शेतकऱ्यांचे सर्वच प्रश्न सुटले नाहीत; मात्र तत्कालीन अडचणींतून त्यांना नक्कीच दिलासा मिळाला आणि पुढील पीककर्ज मिळविण्याचा त्याचा मार्ग मोकळा झाला, हे सर्वच जण मान्य करतात.

**आजही आपल्याकडे सुमारे ३८ टक्के लोकांकडेच आरोग्यविम्याचे कवच आहे, असे आकडेवारी सांगते. परवडतील अशा दरात वैद्यकीय उपचार मिळणे हा नागरिकांचा मूलभूत हक्क आहे आणि यासाठी सरकारी रुग्णालये तेवढ्या तोडीची बनविण्याची जबाबदारीही सरकारवर आहे. मात्र इतकी सक्षम सरकारी रुग्णालये नसल्याने लोकांना खासगी रुग्णालयांकडे जाण्याशिवाय पर्याय नसतो.**

# दुष्टचक्रात 'डॉक्टर-पेशंट' नाते



पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात झालेल्या प्रकारानंतर पुण्यात, तसेच समाजमाध्यमांवर प्रतिक्रियांचा खच पडला. त्यात उलट-सुलट चर्चा झाली. काहींनी अकारण नको त्या गोष्टीही याच्याशी जोडल्या. सध्या तर 'ब्रेकिंग न्यूज' आणि 'मीडिया ट्रायल'च्या जमान्यात पुढची ब्रेकिंग न्यूज येईपर्यंत दोन-चार दिवस विषय तापवत ठेवला जातो. पुढे त्या गोष्टींमधील सत्य चौकशीअंती बाहेर आले की नाही, याची कोणीच दखल घेत नाही. याही प्रकरणात यथावकाश चौकशी समिती, ग्राहक मंच येथे साक्षी-पुरावे, कायदा यांना अनुसरून तथ्य पुढे येईलच. या प्रकरणात दोषींवर कायद्याप्रमाणे कडक कारवाई व्हायलाच पाहिजे. मात्र, या सर्व प्रकरणामुळे आपली सार्वजनिक आरोग्य व्यवस्था किती सक्षम असणे गरजेचे आहे, हेही अधोरेखित झाले. आजही आपल्याकडे सुमारे ३८ टक्के लोकांकडेच आरोग्यविम्याचे कवच आहे, असे आकडेवारी सांगते. परवडतील अशा दरात वैद्यकीय उपचार मिळणे हा नागरिकांचा मूलभूत हक्क आहे आणि यासाठी सरकारी रुग्णालये तेवढ्या तोडीची बनविण्याची जबाबदारीही सरकारवर आहे. मात्र इतकी सक्षम सरकारी रुग्णालये नसल्याने लोकांना खासगी रुगणालयांकडे जाण्याशिवाय पर्याय नसतो.

या प्रकरणी ज्यांनी ज्यांनी खासगी रुग्णालयांबाबत आगपाखड केली, त्यातले किती जण वेळ आल्यावर सरकारी रुग्णालयांत जाऊन उपचार घेतील? गेल्या काही वर्षांपासून डॉक्टर-रुग्णालय आणि रुग्ण हे नाते दुष्टचक्रात अडकलेले दिसून येते. यातील वादाचे प्रमुख कारण हे रुग्णालयातील बिल हे असते. तातडीचे वैद्यकीय उपचार हे, 'हे पोलिस प्रकरण आहे... पैसे भरले नाहीत' या कारणांस्तव थांबविता येणार नाहीत, असे सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट निकाल आहेत, याची माहिती नागरिकांनी आणि रुग्णालयांनी करून घ्यावी. खासगी रुग्णालयांत जे बिल होते त्यामध्ये डॉक्टरांचा हिस्सा तुलनेने कमी असतो. परंतु डॉक्टरच लुटतात, असा समज सर्वत्र पसरला आहे. या पार्श्वभूमीवर दोन्ही बाजूंचा वेध घेणे आवश्यक ठरते.

इतर कुठल्याही व्यावसायिकाचा विचार करता, डॉक्टरांना देवाचे दुसरे रूप म्हणून ओळखले जाते, याबाबत दुमत नसावे. आणि इथे 'भक्तां'ची गल्लत होते. डॉक्टर जर का देव असेल, तर त्याची विटंबना (हल्ला) करू नका, आणि डॉक्टर जर देव नसेल तर त्याच्या मर्यादा ओळखा. सध्या परिस्थिती खरोखर इतकी गंभीर झाली आहे की 'सेव्ह द सेव्हिअर' असे म्हणायची वेळ आली आहे. कारण ताज्या प्रकरणात नामसाधर्म्यामुळे भलत्याच डॉक्टरच्या रुग्णालयाची तोडफोड झाली आणि याचा त्रास तेथील अन्य रुग्णांनाही झाला. माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनीदेखील एका समारंभात याबद्दल चिंता व्यक्त केली होती. डॉक्टरांवरील हल्ले न थांबल्यास डॉक्टर औषधाला देखील मिळणार नाही, असे ते तेव्हा म्हणाले होते.

### एक अपूर्ण शास्त्र

वैद्यक शास्त्र हे एक 'अपूर्ण शास्त्र' म्हणून ओळखले जाते. अजब गुंतागुंतीचे यंत्र समजल्या जाणाऱ्या आपल्या शरीराची पूर्ण ओळख अजूनही झालेली नाही, हे अनेक डॉक्टरदेखील मान्य करतात. व्यक्ती तितक्या प्रकृती असल्याने प्रत्येकावरील उपचारांचा परिणामही वेगवेगळा ठरतो. एखाद्या आजारावर उपचार करण्याच्या वेगवेगळ्या; पण मान्यताप्राप्त व वषार्नुवर्षे वापरलेल्या पद्धती असतात. प्रत्येक उपचार पद्धतीचे स्वतःचे फायदे-तोटे असतात. त्यामुळे संबंधित तज्ज्ञ डॉक्टरांनी त्यांच्या ज्ञानाचा व कौशल्याचा पुरेपूर उपयोग करूनदेखील जर उपचारास यश आले नाही तर त्याचा दोष केवळ डॉक्टरांना देता येणार नाही, तसेच प्रत्येक वेळी रुग्णाचा मृत्यू हा डॉक्टरांच्या हलगजीर्मुळेच झाला, असे गृहीत धरणे अत्यंत चुकीचे आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने तसेच राष्ट्रीय ग्राहक आयोगाने अनेक निकालांमध्ये स्पष्ट केले आहे. कोणत्याही डॉक्टरला आपल्या पेशंटचा मृत्यू व्हावा, असे वाटत नाही. त्यामुळे या 'अपूर्ण'तेची कल्पना आपल्या सगळ्यांना असणे आवश्यक आहे.

### डॉक्टरांना कायद्याचा धाक

वैद्यकीय निष्काळजीच्या खटल्यांत आत्तापर्यंत सर्वोच्च न्यायालयाने संयत निर्णय दिलेले आहेत. योग्य तेथे कोट्यवधी रुपयांची नुकसानभरपाईही रुग्णाला देण्याचे आदेश दिलेले आहेत; डॉक्टरांचे परवाने रद्द केले आहेत. त्याचबरोबर फौजदारी कारवाईचे निकषदेखील घालून दिलेले आहेत. उजव्या हाताऐवजी डाव्या हातावर शस्त्रक्रिया केली, एखाद्या शाखेचे ज्ञान नसतानादेखील त्या शाखेसंदर्भात उपचार केले, शस्त्रक्रियेनंतर पोटात कापसाचा गोळा विसरले अशा प्रकरणांत डॉक्टरांना न्यायालयाने जबर दंड अथवा शिक्षादेखील केलेल्या आहेत. या अशा निकालांमुळेच सध्या डॉक्टर कोणताही धोका पत्करत नाहीत आणि स्वतः निदान करणे शक्य असले तरी आधी बाहेर चाचणी करण्यास सांगतात. चाचणीचे अहवाल 'नॉर्मल' आले तर, उगाच चाचण्या करायला सांगितल्या, असेही म्हणणारे रुग्ण असतात. दुसरीकडे, चाचणी करायला सांगितली नाही, तर डॉक्टर निष्काळजी होता, असेही म्हणतात. एकीकडे होणारे हल्ले आणि दुसरीकडे न्यायालयीन खटल्यांची भीती असे इतर कुठल्याही व्यवसायाबाबत आढळून येत नसेल. यामुळे आता रुग्णालयांत चक्क बाउन्सर्स ठेवणे सुरू झाले आहे.

### बेफिकीर आपण, दोष डॉक्टरांना?

वैद्यकीय निष्काळजीच्या प्रकरणांत बरेचदा 'औषध न घे असोन वेथा, पथ्य न करी सर्वथा, न मिळे आलिया पदार्था, तो येक मूर्ख' असे रामदासस्वामींनी दासबोधात सांगून ठेवले आहे, ते दिसून येते. कायदा असो वा वैद्यकीय उपचार, प्रत्येक प्रकरण हे वेगळे असते. त्यामुळे दुसऱ्याला लागू झालेला निकाल किंवा औषध हे आपल्याला चालेलच, असे नसते. एकीकडे बेफामपणे गाडी चालवायची आणि अपघाताला निमंत्रण द्यायचे, किंवा डॉक्टरांनी, दारू पिऊ नका, असे सांगितले तरी खूप प्यायची आणि मग किडन्या-लिव्हर निकामी झाले कि त्या परत उत्तम व्हाव्यात म्हणून डॉक्टरांकडे जायचे, किंवा चाचणी अहवालात शुगर कमी दिसावी म्हणून फक्त दोन दिवस अजिबातच गोड खायचे नाही आणि मग शुगर कमी होत नाही म्हणून ओरडायचे, इंटरनेटवरून माहिती घेऊन स्वतःचे स्वतःच उपचार करायचे आणि या सर्व प्रकारात गुण आला नाही, आजार बरा झाला नाही म्हणून खापर डॉक्टरांवर फोडायचे आणि शेवटी डॉक्टरांनाच मारायचे आणि बिल कमी करून घ्यायचे, असेही प्रकार घडत असल्याचे दिसते. आपल्या उपचारांचे पेपर्स, रिपोर्ट्स आदी मागण्याचा रुग्णालयाल हक्क असतोच. त्याचप्रमाणे एखाद्या रुग्णालयातील उपचार परवडत नसतील किंवा रुग्णालयावर विश्वास नसेल, तर डिस्चार्ज घेण्याचा हक्क देखील रुग्णाला आहे. मात्र अशा वेळी पहिले रुग्णालय 'वैद्यकीय सल्ल्याच्या विरुद्ध डिस्चार्ज घेतला' असे लिहून घेते आणि पुढे काही गुंतागुंत झाल्यास त्याची जबाबदारी त्या रुग्णालयावर राहत नाही.

एकंदरीतच सध्या समाजामधील सहनशीलता संपत चालली आहे. सोशल मीडियावरती अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली ज्या काही प्रतिक्रिया लिहिल्या जातात त्याला तर काही धरबंधच नाही. खचाखच गर्दीत गाडीचा थोडासा जरी धक्का लागला तरी लोक प्रचंड हमरीतुमरीवर आल्याचे दिसून येते. 'कमीत कमी कायदे आणि कमीत कमी रुग्णालय' ही आदर्श व्यवस्था अशक्य आहे, परंतु त्या दिशेने प्रयत्न व्हायला काय हरकत आहे?

# शांतता की शत्रुत्व?



आमच्यासोबतचे शत्रुत्व थांबवा, हे केंद्र सरकारकडून नव्हे, तर माओवादी संघटनांतर्फे आलेले आवाहन आहे. देशविरोधी कारवाया करणाऱ्यांनी संवादाचा मार्ग स्वीकारणे हा अचंबा कमी होता म्हणून की काय, आता माओवाद्यांकडून वैमनस्य विसरण्याची अपेक्षा केली जाते आहे. कारवाई खंबीर असली, की कोणती किमया घडू शकते याचे प्रत्यंतर माओवाद्यांच्या या भूमिकेने दिले. माओवाद्यांच्या शांतता प्रस्तावाचे भविष्यातील परिणाम अद्याप अस्पष्ट आहेत. केंद्राच्या निर्णायक लढ्यातील संभाव्य यशाचे संकेत मात्र त्यात आहेत. माओवाद्यांचा शांतता प्रस्ताव सरकारला गुंगारा देण्याचा प्रयत्न आहे की, मुदतीत नांगी ठेचण्याच्या प्रयत्नांमधील यश, ही चर्चा आता रंगेल. माओवाद्यांच्या प्रस्तावाकडे दुर्लक्ष न करता केंद्राच्या बुलंद इराद्यांची प्रशंसा व्हायला हवी.

'असाध्य ते साध्य करिता सायास, कारण अभ्यास तुका म्हणे' या ओवीत प्रयत्नवादाचा सिद्धान्त येतो. नरेंद्र मोदी सरकारने काश्मिरातील ३७० कलम हटविण्याचे सुतोवाच केले तेव्हा अनेकांनी केंद्राला वेडात काढले. प्रत्यक्षात हे कलम रद्द झाल्यानंतर खोऱ्याने औद्योगिक प्रगतीकडे वाटचाल सुरू केली. माओवाद निखंदून काढण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रयोगाच्या घोषणेनंतरही साशंक मनांची कोल्हेकुई वाढली. पुढील वर्षी मार्चपर्यंत माओवाद हद्दपार करण्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी जाहीर केले आणि ते कामाला लागले. माओवाद्यांची चहुबाजूने कोंडी झाली. अर्थातच, वर्षभरात माओवाद संपणे अशक्य असल्याचीच प्रतिक्रिया आली. खेड्यापाड्यात जाऊन सरपंच, तलाठ्यांच्या हत्या करायच्या, पोलिसी खबरी असल्याच्या संशयावरून भर बाजारात अनेक निष्पापांचे मुडदे पाडायचे, देशाच्या संपत्तीची होळी करायची हे माओवाद्यांचे नित्याचे काम झाले होते.

जनमानसातील दहशत कमी होऊ न देण्याच्या व्यूहरचनेतून त्यांनी अव्याहत छळसत्र चालविले. ग्रामीण सूडचक्रासोबतच शहरी भागात अर्बन नक्षलवाद्यांच्या माध्यमातून असत्य कथन दृढ करण्याचीही पद्धतशीर खेळी माओवाद्यांनी यशस्वी केली. सरकारच्या विरोधात रोष निर्माण करून सामान्यांचा दिलासा मिळविण्याच्या त्यांच्या कारस्थानांची काही प्रमाणात सरशी झाली. लोकलढ्याच्या गोंडस नावाखाली, सामाजिक क्रांतीच्या देखण्या आवरणाखाली त्यांनी हजारो निष्पाप युवकांना कह्यात ओढले. आदिवासींची शस्त्रे आदिवासींच्याच विरोधात वापरली. पोलिस हे सामान्य जनतेचे शत्रू असल्याचे चित्र रंगविले. हा अपप्रचार खोडून ग्रामीण जनतेला राष्ट्रीय प्रवाहात आणणे सोपे नव्हते. आधी संवाद, पुढे विकास आणि नंतर संघर्ष अशा केंद्र आणि राज्याच्या संयत धोरणाला आता कुठे यश मिळू लागले आहे.

ग्रीन कॉरिडॉरमधील कोंडी दूर करून विकासाच्या योजनांच्या सर्वदूर समन्यायी वाटपाची योजना केंद्राने आखली. राज्यांच्या मदतीने माओवाद्यांचे पुनर्वसन केले. नव्या भारताची भक्कम प्रतिमा केवळ लाभदायी योजनांमुळे नाही, तर नागरिकांमध्ये सुरक्षेबद्दलचा खंबीर विश्वास तयार करण्याच्या प्रयत्नांमुळे रुजली. माओवाद्यांनी प्रामाणिक व्यवस्थेपुढे छिन्नविच्छिन्न लक्तरे टांगली. गृह मंत्रालयाने प्रशासनाचा निश्चय भंगू दिला नाही. माओवादी संघटनांवरील बंदी उठवावी, तुरुंगातील माओवादी नेत्यांची सुटका करावी, माओवादग्रस्त भागातील सुरक्षा तळ बंद करावेत आदी अटी घालून माओवाद्यांनी यापूर्वीही संवादाची शक्यता वर्तविली होती. भाकप (माओवादी) केंद्रीय समितीचा प्रवक्ता अभय याने आता चर्चेच्या पूर्वअटींमध्ये तत्काळ युद्धबंदी आणि सुरक्षा दलांना माघारी बोलविण्याचे आवाहन केले. चारशेहून अधिक माओवादी मारल्याची कबुली दिली.

महिला माओवाद्यांवर लैंगिक अत्याचार करून अनेकांना फाशी दिल्याचा त्यांचा आरोप आहे. देशातील सर्वाधिक माओवादग्रस्त जिल्ह्यांची संख्या बाराहून सहावर आली आहे. आता आलेल्या माओवाद्यांच्या प्रस्तावामागे सुरक्षा दलांच्या नियोजनबद्ध प्रयासांचा वाटा आहे. गौण खनिजांच्या व्यवस्थापनासाठी गडचिरोलीत पोहचलेले जिल्हा खनिकर्म प्राधिकरण हा विकासाचा टप्पा आहे. आत्मसमर्पणाच्या प्रस्तावाचे अधोरेखन करून सरकारने कणखर भूमिका घेतली हे महत्त्वाचे. स्पष्ट आणि प्रामाणिक पुढाकाराखेरीज सरकारी कारवाया न थांबविण्याच्या इशाऱ्यातून सरकारी आत्मविश्वास झळकला. 'लिबरल असलो तरी लेचेपेचे नाहीत' या सरकारी प्रस्तावाला विरोधी पक्षांनीही पाठिंबा द्यावा. शांतता सर्वांनाच हवी आहे. संविधानानुसार चर्चेसाठी पुढाकार घेणारे माओवादी देशाचे शत्रू कसे असू शकतील?

# उकडवून स्वादिष्ट कॉर्न बॉल्स बनवा

स्वीट कॉर्नपासून अनेक प्रकारचे पदार्थ बनवता येतात. लोकांना भुट्टा देखील आवडतो आणि तो आरोग्यासाठी देखील फायदेशीर ठरू शकतो. स्वीट कॉर्न चवीला काहीसा गोड असतो. ते उकडवून खाऊ शकता किंवा काही स्नॅक्स देखील बनवू शकता. थाई स्वीट कॉर्न रेसिपी देखील बनवू शकता. ही रेसिपी करायला खूप सोपी आहे. चला तर मग साहित्य आणि कृती जाणून घेऊ या.

**साहित्य :** कणीस, लेमन ग्रास (लेमन ग्रासचे भारतीय नाव), लिंबाचा रस, बेकिंग पावडर, काळी मिरी, करी पेस्ट, नारळ पावडर, कॉर्न फ्लोअर आणि मीठ.

**पाककृती :** वाफवलेले कॉर्न बॉल्स बनवण्यासाठी कॉर्न पाच मिनिटे उकडवा. आता कॉर्नमधील पाणी पिळून घ्या. नंतर उकडलेले कॉर्न ग्राइंडरमध्ये बारीक करून पेस्ट तयार करा. या कॉर्न पेस्टमध्ये नारळाची दूध पावडर, चिरलेला लेमनग्रास, लिंबाचा रस, हिरवी करी पेस्ट, कॉर्नफ्लोअर, बेकिंग पावडर, काळी मिरी पावडर आणि मीठ घाला.

सर्व साहित्य चांगले मिसळा आणि या मिश्रणाचे छोटे गोळे बनवा. कॉर्न बॉल्स स्टीमरमध्ये १०-१२ मिनिटे शिजवा. स्टीम कॉर्न बॉल्स तयार आहेत. चटणीसोबत सर्व्ह करा.



# या '3' घरगुती फ्रूट मास्कने करा सनटॅनच्या समस्येला अलविदा!

उन्हात काळवंडलेली त्वचा पुन्हा तजेलदार करण्यासाठी ब्युटीपार्लरच्या ट्रीटमेंटपेक्षा करा हे घरगुती उपाय. वीकेंडला घरच्या घरी काही फळांच्या मदतीने त्वचा (exfoliate) मोकळी करून सौंदर्य खुलवण्यासाठी कॉस्मोलॉजिस्ट यांनी सुचवलेले हे काही उपाय नक्की अजामावून पाहा.



## कलिंगड आणि काकडीचा मास्क

कलिंगडामध्ये पाण्याचा अंश अधिक असतो. त्यामुळे त्वचा मऊ आणि तजेलदार राहण्यास मदत होते. काकडीमध्ये पाणी मुबलक असल्याप्रमाणेच ब्लिचिंग क्षमताही आढळते. यामुळे टॅन कमी करण्यास आणि त्वचेचा रंग हलका करण्यास मदत होते.

**कसा बनवाल**

- कलिंगड आणि काकडीचा पल्प एकत्र करा. तयार मिश्रण चेहऱ्यावर लावा.
- rq मिनिटांनंतर चेहरा थंड पाण्याने स्वच्छ करा.

## पीच आणि टोमॅटोचा मास्क

पीचमध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. यामुळे त्वचेचे पोषण होते. पीचमधील मॉईश्चरायझिंग घटक आणि टोमॅटोमधील क्लिन्जिंक करण्याचे गुणधर्म त्वचेला अधिक तजेलदार बनवते.

**कसा कराल हा पॅक**

- एक पीच आणि टोमॅटो यांची एकत्र पेस्ट करावी.
- यामध्ये एक चमचाभर मध मिसळा.
- तयार मिश्रण चेहऱ्यावर लावावे. त्यानंतर अर्ध्या तासाने चेहरा कोमट पाण्याने स्वच्छ धुवा.
- अशा घरगुती मास्कचा नियमित आणि योग्य पद्धतीने वापर केल्यास त्वचा अधिक तजेलदार होण्यास मदत होते. टॅन काढण्यासोबतच सौंदर्य खुलवण्यास या मास्कचा उपयोग होतो.

## ॲव्हॅकॅडो आणि पपई

ॲव्हॅकॅडोमध्ये व्हिटॅमिन ई घटक मुबलक असल्याने त्वचा आरोग्यदायी राहण्यास तसेच उजळण्यास मदत होते. पपई टॅन कमी करण्यास मदत करते. तसेच व्हिटॅमिन ए घटक त्वचेला पोषण देतात.

**कसा बनवाल मास्क**

- एका मोठ्या वाटीमध्ये चार टीस्पून ॲव्हॅकॅडोची पेस्ट आणि पपईची पेस्ट मिसळा.
- त्यामध्ये १ टीस्पून बदामाचे तेल आणि ३-४ थेंब ylang-ylang essential oil मिसळा.
- या पॅकने चेहऱ्यावर आणि मानेवर मसाज करा. हा मास्क ५-१० मिनिटे ठेवा.
- त्यानंतर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुवा. थोड्या वेळाने चेहरा सुती कापडाने कोरडा करा. त्यानंतर चेहऱ्यावर मॉईश्चरायझर लावा.
- हा उपाय नियमित करा.



# केवळ स्वाद नव्हे तर गुणांनीही परिपूर्ण उसाचा रस

**उन्हाळ्याची** काहिली आता चांगलीच जाणवू लागली आहे आणि त्यामुळे साहजिकच लोकांची पावले आईस्क्रीम पार्लर, थंड पेये विकणाऱ्या दुकानांकडे वळू लागली आहेत. त्यातच उसाच्या गुऱ्हाळांनी म्हणजे रसवंतीगृहांनी त्यांचे संसार सुरू केले असून थंडगार, स्वादिष्ट आणि आले-लिंबू घालून केलेला गारेगार रस पिण्यासाठी गर्दी होऊ लागली आहे.



उसापासून मिळणारा हा नैसर्गिक रस केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठी खूपच फायदेशीर आहे. अँटीऑक्सिडंटनी समृद्ध असा हा रस रोगप्रतिकारक शक्ती वाढविणारा आहे. आयर्न, मॅग्नेशियम, कॅल्शियम व अन्य इलेक्ट्रोलाईट्सचे प्रमाण या रसात पुरेसे असते, त्यामुळे डीहायड्रेशन झालेल्यांना रस पिणे फार उपयुक्त ठरते. सर्वसामान्य सर्दी आणि अन्य किरकोळ साथीचे आजार रोखण्यास रस पिणे फायद्याचे आहे तसेच ताप उतरवण्यासाठी सुद्धा रस पिण्याचा उपयोग होतो कारण उसाचा रस शरीरात प्रोटीनची पातळी वाढवितो.

उसाच्या रसात कर्बोदके, प्रथिने, शिवाय आयर्न, पोटॅशियम अधिक मात्रेत असते यामुळे एक ग्लास उसाचा रस शरीरातील ऊर्जेची पातळी वाढवितो आणि शरीराचा थकवा दूर करतो. रक्तातील प्लाझ्मा आणि अन्य तरल पदार्थ वाढवितो. मूत्रपिंडाच्या विकारात म्हणजे किडनी स्टोनमध्ये रस पिणे फायद्याचे आहे. तसेच हा रस दात किडणे आणि श्वास दुर्गंधी रोखणारा आहे. यकृत म्हणजे लिव्हरला बळ देणारा असल्याने कावीळ झाल्यास उसाचा रस द्यावा, असे सांगितले जाते. आयुर्वेदानुसार उसाच्या रसाचे सेवन बद्धकोष्ठता दूर करणारे आहे आणि रसात असलेल्या क्षारांमुळे पित्त, पोटातील जळजळ दूर होते. उसाच्या रसात ए तसेच सर्व प्रकारची बी व्हिटॅमिन्स असतात, म्हणूनही उसाचा रस आरोग्यवर्धक ठरतो. फक्त रसवंतीगृहात रस पिताना उघड्यावरच बर्फ घालणे टाळावे तसेच रसवंतीगृहाची तेथील ग्लास, रस पिळणारे चरक यांची स्वच्छता आहे याची खात्री करून घ्यावी.

# ग्रीन कॉफीदेखील आरोग्यासाठी लाभदायक

**सकाळी** उठल्यावर वाफाळत्या कॉफीचा कप कोणाला नकोसा असेल? विशेषतः थंडीमध्ये किंवा पावसाच्या दिवसांमध्ये कॉफी मिळाली की मोसमाचा आनंद आणखीनच वाढतो, आणि शरीराची मरगळ दूर होऊन शरीरामध्ये नवे चैतन्य येते. पण केवळ शरीराची मरगळ दूर करणे आणि शरीरामध्ये चैतन्य निर्माण करणे एवढ्यापुरताच कॉफीचा उपयोग नाही. कॉफीचे सेवन आपल्या आरोग्याच्या दृष्टीने देखील फायद्याचे ठरण्यासाठी ग्रीन टीप्रमाणेच ग्रीन कॉफीचे सेवन करणे गरजेचे आहे. कॉफीच्या बिया भाजण्याच्या आधी हिरव्या असतात. याच बियांपासून तयार केली गेलेली कॉफी आरोग्यासाठी उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. ही कॉफी आरोग्याच्या दृष्टीने कशाप्रकारे उपयोगी आहे हे जाणून घेऊ या.

ग्रीन कॉफीमध्ये कॅफीनचे प्रमाण कमी असते. तसेच यामध्ये असलेले क्लोरोजेनिक ॲसिड वजन घटविण्यास सहाय्यक आहे. या तत्त्वामुळे शरीराच्या चयापचय शक्तीला चालना मिळत असून, शरीरातील ब्लड शुगर लेव्हल नियंत्रित राहण्यास मदत होते. शरीरातील साठून राहिलेले ग्लुकोज आणि चरबीचे प्रमाण या कॉफीच्या सेवनाने कमी होऊ लागते. त्यामुळेच संतुलित आहार आणि नियमित व्यायाम यांच्या जोडीने ग्रीन कॉफीचे सेवन वजन घटविण्याच्या दृष्टीने फायद्याचे ठरते. क्लोरोजेनिक ॲसिडमध्ये पोटॅशियमचे प्रमाण जास्त असून यामध्ये सोडियमचे प्रमाण कमी असते. यामुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते. त्याचप्रमाणे ग्रीन कॉफीच्या बिया कच्च्या आणि कोणत्याही प्रक्रिया केलेल्या नसल्यामुळे यांच्यामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण अधिक असते. म्हणूनच ग्रीन कॉफीच्या सेवनाने शरीरावर हानीकारक फ्री रॅडिकल्सचा प्रभाव कमी होतो. तसेच ग्रीन कॉफीमध्ये असणारे राहिडिक ॲसिड त्वचेला आर्द्रता प्रदान करणारे आहे.



# पासवर्ड आठवतच नाहीये? काळजी नको, पासवर्डशिवाय अनलॉक करा मोबाईल, पाहा ट्रिक्स

सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रत्येकजण स्मार्टफोनला लॉक ठेवतो. फोनमध्ये अनेक वैयक्तिक आणि महत्त्वाच्या गोष्टी सेव्ह असतात. या गोष्टी कोणी पाहू नयेत, अशी युजर्सची इच्छा असते. यामुळेच मोबाईल लॉक करणे ही पयार्यापेक्षा गरज बनली आहे. पण जर तुम्ही तुमचा पासकोड विसरलात तर? तुमचा सर्व डेटा देखील करप्ट होऊ शकतो. विसरलेला पासकोड परत मिळवणे अनेकांसाठी कठीण असते. ही समस्या तुम्ही आधीच सोडवली तर बरे. आज आम्ही तुम्हाला अशा पद्धतीबद्दल सांगत आहोत, ज्याद्वारे तुम्ही पासवर्ड न टाकता तुमचा फोन अनलॉक करू शकता. परंतु, पिन किंवा पासवर्ड सेट करण्यापूर्वी तुम्हाला ही पद्धत करावी लागेल.

**स्मार्ट लॉकसह अनलॉक करा :** हे एक अँड्रॉईड फीचर आहे, जे तुम्हाला काही विशिष्ट परिस्थितींमध्ये लॉक स्क्रीन सुरक्षिततेला बायपास करण्याची परवानगी देते. यासाठी तुम्हाला सेटिंगमध्ये जाऊन सिक्युरिटीमध्ये जावे लागेल. यानंतर तुम्हाला स्मार्ट लॉकमध्ये जावे लागेल. तो तुमचा फोन लॉक लक्षात ठेवेल. पिन सेट करण्यापूर्वी हे करणे आवश्यक असेल.

**ऑन-बॉडी डिटेक्शन :** येथे तुम्हाला ऑन-बॉडी डिटेक्शनसह पासवर्डशिवाय तुमचे विद्यमान लॉक अनलॉक करण्यासाठी ५ पर्याय दिले जातील. यामध्ये तुम्ही फोन हातात घेतला आहे की नाही हे फोनला कळेल. फोन तुमच्या हातात किंवा खिशात असल्यास फोन आपोआप अनलॉक होईल.



**विश्वसनीय ठिकाणे :** तुमचा फोन आपोआप अनलॉक होईल असे स्थान तुम्ही निवडू शकता.

**विश्वसनीय उपकरणे :** विश्वासार्ह फिटनेस ट्रॅकर किंवा कारसारख्या अन्य ब्लूटूथ उपकरणाशी कनेक्ट केल्यावर तुमचा फोन आपोआप अनलॉक होईल.

**विश्वासार्ह चेहरा :** फोन अनलॉक करण्यासाठी फेशियल रेकग्निशन वापरा.

**व्हॉइस मॅच :** तुमचा फोन तुमचा आवाज ओळखताच, तो तुमचा फोन अनलॉक करेल. हे वैशिष्ट्य अँड्राइड ८ ओरियो नंतर बंद करण्यात आले होते परंतु ते अद्याप जुन्या उपकरणांवर काम करते.

# रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी करा 'ही' योगासने

रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी कोणतीही औषधे घेण्यापेक्षा योगासन करणे फायदेशीर आहे. योगासने दररोज केल्यास प्रतिकारशक्ती वाढते. जाणून घेऊयात काही योगासने...

## उष्ट्रासन योग

गुडघ्यावर उभे राहा. आता मागच्या बाजूला वाकून हाताने टाचांना पकडण्याचा प्रयत्न करा. डोके आणि पाठीच्या कण्याला जास्तीत जास्त मागे वाकवा. १०-१५ मिनिटे याच स्थितीत राहा. या योगासनामुळे दम्याच्या रुग्णांसाठी हे उत्तम आसन आहे. मधुमेहाला ठीक करते. फुफ्फुस मजबूत होते.



## पर्वतासन योग

उजव्या पायाला सरळ करून डाव्या पायाजवळ ठेवा. शरीराला हातावर संतुलित करा. आता कंबरेच्या भागाला जास्तीत जास्त वरच्या बाजूला उचला. डोके दोन्ही हातांमध्ये आणा. हातांना सरळ ठेवा आणि टाचा जमिनीला टेकवा. कंबरेला वर उचलत हळूहळू श्वास सोडा. या योगासनामुळे रक्तप्रवाहामध्ये वाढ होते. दृष्टी चांगली होते. शरीराची लवचिकता वाढते.

## सुप्त वज्रासन योग

वज्रासनात बसताना लक्षात ठेवा की, गुडघे आणि बोटे एकमेकाला चिकटलेली असावी. हळूहळू हाताला मागे घेऊन जमिनीला टेकवा. मान वर उचला आणि दीर्घ श्वास घ्या. यामुळे छातीला फुगवून शरीरात ऑक्सिजन वाढवते. बद्धकोष्ठता दूर करते. मेरुदंडाला फायदा होतो.



# हे जाणून घेतल्यावर लगेच लावाल केसांना दही

आरोग्यासाठी दही खाणे उत्तम आहे हे तर सर्वांना माहीत आहे पण दह्याने त्वचा आणि केसांचेही सौंदर्य वाढते हे कमी लोकांना माहीत असेल. नियमित दही लावल्याने चेहऱ्यावर ग्लो येतो आणि केसांवर वापरल्याने डेड्रफ दूर होतो आणि केसही मजबूत होतात. तर आता साबण आणि शॅम्पूवर खर्च करणे सोडून दही लावा आणि जाणून घ्या किती गुणकारी आहे हे ते...

## केसांसाठी कंडिशनर

हे केसांसाठी नैसर्गिक कंडिशनरचे काम करते. पूर्ण केसांवर दही लावून शॉवर कॅप लावून घ्या. ३० मिनिटांनी केस धुवून टाका.

## केस होतील मुलायम

दह्याला मधात मिसळून मास्क तयार करा. हे केसांना लावल्याने केस मुलायम होतील. हे १५ ते २० मिनिटापर्यंत केसांना लावून ठेवावे नंतर धुवून घ्यावे.

## केसांमध्ये चमकसाठी

केसांना मॉइश्चराइज करून चमक आण्यायची असेल तर दह्याला मायोनीजबरोबर मिसळावे. हे मिश्रण केसांच्या शेवटच्या कोपऱ्यापर्यंत लावावे. अर्ध्या तासाने केस सामान्य पाण्याने धुवून टाकावे.

## दोन तोंडी केसांपासून मुक्ती

आठवड्यातून दोन दिवस केसांमध्ये दही लावा, आपली दोन तोंड असलेल्या केसांची समस्या सुटेल. केस मजबूत होतील.



## कोंड्यापासून सुटका

कोंड्याची समस्या असल्यास दही आणि लिंबाची पेस्ट लावल्याने आराम मिळेल. आठवड्यातून दोनदा हा उपाय अमलात आणा.

## केस गळतीवर असरदार

कढीपत्ता दह्यात मिसळून पूर्ण केसांवर लावल्याने केस गळतीवर फायदा मिळेल तसेच पांढऱ्या केसांपासून मुक्तीही मिळेल.





## केस वाढीसाठी

दही, नारळाचे तेल आणि जास्वंद फुलाची पाने मिसळून पेस्ट तयार करा. ही पेस्ट केसांना लावून १ ते २ तासांसाठी तसेच राहून द्या. नंतर केस धुवून कंडिशनर लावून घ्या.

# मधल्या वेळेच्या भुकेसाठी सेवन करावेत हे 'स्नॅक्स'

**सकाळचा** भरपेट नाश्ता, दुपारचे आणि रात्रीचे भोजन, ही आपल्या दिनक्रमातील तीन महत्त्वाची भोजने मानली गेली आहेत. या तीन भोजनांच्या व्यतिरिक्त मधल्या वेळी लागणाऱ्या भुकेसाठी काही खाल्ले गेले नाही, तर पुढील भोजनाच्या वेळी जास्त भूक लागल्यामुळे प्रमाणाबाहेर जास्त भोजन घेतले जाते. परिणामी अपचन, ॲसिडिटी सारख्या समस्या उद्‌भवतात. तसेच अधून मधून लागणाऱ्या भुकेवर उपाय म्हणून चिप्स, भजी, वडापाव, सामोसे अशा पदार्थांची जोड अनेकदा आपण देत असतो. मधल्या वेळी खाल्ल्या गेलेल्या अशा पदार्थांमुळे वजन वाढण्यास सुरुवात होते. त्यामुळे मधल्या वेळेची भूक शमवण्यासाठी असे पदार्थ आहारामध्ये समाविष्ट केले जावेत, जे पचण्यास हलके असतील आणि ज्यांच्या सेवनामुळे वजनही वाढणार नाही. मधल्या वेळेच्या भुकेसाठी सुका मेवा हा चांगला पर्याय ठरू शकतो. अक्रोड, बदाम, शेंगदाणे, खारीक इत्यादी सुका मेवा आरोग्याच्या दृष्टीनेही उत्तम आहे. या मेव्यातून शरीराला आवश्यक जीवनसत्त्वे, प्रथिने, फायबर आणि ओमेगा थ्री मिळत असतात. त्यामुळे सुक्या मेव्याच्या सेवनाने भूकही शमते आणि शरीराला पोषण मिळते. याव्यतिरिक्त पनीर मधल्या वेळेच्या भुकेसाठी चांगला पर्याय आहे. पनीरमध्ये प्रथिने असून, यामुळे भूक लवकर शमते. शरीरातील स्नायूंच्या बळकटीसाठी प्रथिने आवश्यक असून, ही प्रथिने पनीरसारख्या पदार्थांमधून मिळतात. पनीर कच्चे किंवा ग्रिलवर भाजून घेऊन सॅलड बरोबर खाता येऊ शकते. भाजलेले किंवा कच्चे चणे, कच्चे हरभरे, फुटाणे हा ही पर्याय मधल्या वेळेच्या भुकेसाठी चांगला. यामध्ये प्रथिनांच्या जोडीने फायबर, क्षार आणि जीवनसत्त्वे आहेत. यांच्या सेवनाने ब्लडशुगर लेव्हल्स नियंत्रित राहण्यास मदत होते. रताळ्यामध्ये सावकाश पचणारी कर्बोदके आणि डायटरी फायबरची मात्रा अधिक असून, शरीराला सक्रिय ठेवणारी ऊर्जा यातून मिळते. मधल्या वेळेच्या भुकेसाठी ताजी फळे हा देखील उत्तम पर्याय आहे. तसेच फळे आपल्यासोबत कुठेही नेता येणे शक्य असल्याने कामानिमित्त बाहेर पडण्याची वेळ आली तरी मधल्या वेळेची भूक भागवण्यासाठी हा उत्तम, पौष्टिक पर्याय आहे.



# तुमचा 'संतुलित' आहार आजारपणास कारणीभूत ठरत नाही ना?

संतुलित आणि योग्य आहार म्हणजे नेमके काय आणि त्याचा अवलंब कसा करावा याबद्दल आहारशास्त्रामध्ये अनेक पर्याय सुचवले गेले आहेत. अशा या निरनिराळ्या पयार्यांमुळे योग्य आहार नेमका कसा असावा याबद्दल मनामध्ये खूप गोंधळ उडणे साहजिक आहे. उदाहरण द्यायचे झाले, तर वाईनचे देता येईल. आहारशास्त्रातील एका अभ्यासकाच्या मते वाईनच्या मर्यादित सेवनाने दातांमधील व हिरड्यांमधील हानीकारक जीवाणूंचा नाश होतो तर आणखी एका रिसर्चच्या मते आहारातील वाईनचे सेवन त्वचेच्या कर्करोगाला कारणीभूत ठरू शकते.



**अधून**मधून काही ठरावीक तऱ्हेचे डायट शरीराच्या, आरोग्याच्या दृष्टीने अतिशय चांगले असल्याचे ऐकिवात येत असते. उदाहरणार्थ फ्रूट डायट किंवा आहारामध्ये डार्क चॉकलेट किंवा समुद्री मिठाचा वापर करणे अशा प्रकारचे सल्ले दिले जात असतात. पण अशा प्रकारची डायट किंवा असे अन्नपदार्थ खरोखरच शरीराच्या दृष्टीने फायदेशीर आहेत किंवा नाही याचा विचार करणे अगत्याचे ठरते. डार्क चॉकलेटमध्ये अँटी ऑक्सिडंट्स असून साखरेचे प्रमाण देखील यामध्ये कमी असते. पण तरीही यामध्ये कॅलरीजचे प्रमाण लक्षणीय असल्याने याचे सेवनदेखील इतर गोड पदार्थांप्रमाणे, मर्यादित प्रमाणात करायला हवे, असे आहारतज्ज्ञ म्हणतात. तसेच आजकाल मैद्याने बनवलेल्या ब्रेड ऐवजी मल्टी ग्रेन ब्रेड किंवा होल व्हीट ब्रेड जास्त पौष्टिक समजला जातो. पण ब्रेड जरी कोणत्याही प्रकारचा असला, तरी त्यामध्ये साखर, ट्रान्स फॅट्स आणि काही प्रमाणात मैदा असतोच हे लक्षात घ्यायला हवे. होल व्हीट ब्रेडमध्ये फायबरचे प्रमाण जास्त आहे, आणि जीवनसत्त्वे देखील यामध्ये आहेत. तसेच मल्टी ग्रेन ब्रेड, लो ग्लायसेमिक इंडेक्स असलेल्या धान्यांपासून बनवला जातो. पण तरीही काही प्रमाणात ट्रान्सफॅट आणि मैदा यांचा वापर यामध्ये केलेला असतो. त्याचप्रमाणे न्यूट्रिशन बार्सदेखील प्रमाणामध्ये सेवन करणे आवश्यक आहे, कारण यामध्ये साखर आणि फॅटचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे जेव्हा त्वरित ऊर्जेची, म्हणजे एनर्जीची आवश्यकता असेल आणि इतर कोणताही पर्याय उपलब्ध नसेल, तेव्हाच एनर्जी बार्सचे सेवन केले जावे. फळे आरोग्यासाठी उत्तम आहेत, हे आपल्याला ठाऊक आहे, पण फळांमध्ये देखील साखरेचे प्रमाण असतेच. त्यामुळे फळे किती आणि कधी खाल्ली जावीत याचा विचार करणे गरजेचे आहे. फळांचे सेवन शक्यतो दिवसाच्या सुरुवातीला केले जावे. सकाळी फळे खाल्ली जात नसल्यास त्यांचे सेवन शक्यतो दिवसाच्या पूर्वार्धात होईल असे पाहावे. त्याचप्रमाणे समुद्री मीठ हे सामान्य मिठाच्या मानाने जास्त आरोग्यदायी आहे असे समजले जाते. खरे तर दोन्ही प्रकारच्या मिठांमध्ये सोडियमची मात्रा चाळीस टक्के, म्हणजे एका टीस्पूनमध्ये २३०० मिलीग्राम इतकी आहे. पण समुद्री मिठाचे कण आकाराने मोठे असल्याने ते आपोआपच कमी वापरले जाते. पण म्हणून सामान्य मीठ वापरण्यात देखील काही अपाय नाही. मुळातच आहारामध्ये मिठाचे प्रमाण मर्यादित असायला हवे, हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

# जिल्ह्यात 'हर घर जल' योजनेस 'घर घर'
# निधीअभावी जलजीवन मिशनचे तीनतेरा

**■ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील प्रत्येक घरात शुद्ध पाण्याचा पुरवठा व्हावा, या उद्देशाने केंद्र सरकारच्या माध्यमातून 'हर घर जल' योजना राबविण्यात येत आहे. या योजनेतील कामे २०२४ पर्यंत पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागातर्फे निविदा प्रक्रिया राबवून ही कामे पूर्ण केली जात आहे. परंतु या योजनेसाठी दीर्घकालीन तसेच मोठ्या निधीची आवश्यकता असल्याने निधीअभावी जिल्ह्यात या योजनेचे तीनतेरा वाजले आहेत.

यंदा मार्च महिन्यापासूनच ऊनाच्या झळा लागू लागल्या आहेत. उन्हाळ्यात जिल्ह्यातील पाणीटंचाई तीव्र होत असताना पाण्यापेक्षा फक्त विविध शासकीय योजनांचा महापूरच अधिक वाहत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. मागील पंचवीस वर्षांचा आढावा घेतला तर जिल्ह्यातील पाणीटंचाई कमी व्हावी म्हणून अनेक योजनांची घोषणा करण्यात आली. मात्र योजना पूर्ण करण्यासाठी लागत असणाऱ्या निधीचा दुष्काळ असताना जिल्ह्यात पाणीटंचाईची झळ दिवसोंदिवस वाढत असल्याचे दिसून येत आहे.

जल स्वराज्य, राष्ट्रीयपेय जल, भारत निर्माण, हर घर जल, जल जीवन मिशन अशा अनेक योजना फक्त कागदापुरत्या उरल्या आहेत. प्रत्येक घरात शुद्ध गुणवत्तापूर्ण पाणी देण्यासाठी शासनाची बहुचर्चित घर जल योजनेची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी होऊ शकली नाही. पाणीपुरवठा विभागाच्या अकार्यक्षम यंत्रणामुळे ग्रामीण परिसरातील गावे, पाडे, विशेषतः आदिवासी पाडे तहानलेलेच आहेत.



**गुन्हेगारांचा माग काढणे सोयीचे होणार**

राज्य शासनाची संकल्पना आणि लोकसहभाग यातून निर्माण होणाऱ्या सीसी कॅमेऱ्याचे जाळे यामुळे सुरक्षेचे एक कवच तयार होणार आहे. भौगोलिक क्षेत्र मोठे असलेल्या परिसरात गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांचा कस लागतो. मात्र सदर परिसर सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या कक्षेत आल्या नंतर सीसीटीव्ही कॅमेरे गावातील अंतर्गत हालचाली, गुन्हेगारी स्वरूपाची घटना घडल्यास तपासासाठी गुन्हेगाराचा माग काढण्यासाठी या सीसी कॅमेऱ्यांची मोठी मदत होणार आहे. त्याचप्रमाणे तडीपार गुन्हेगाराचा फोटो टाकून त्याचा ठावठिकाणा काढणे शक्य होणार आहे.

धरणांचा तालुका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहापूर तालुक्यात पाणीटंचाईने उग्ररूप धारण केले आहे. या तालुक्यात जल जीवन मिशन खाली सुरू असलेली कामे निधीअभावी थांबलेली आहेत तर दुसरीकडे पाटबंधारे खात्याच्या सहा धरणातील पाण्याने तळ गाठला आहे. एकट्या शहापूर तालुक्यात ११० ग्रामपंचायत हद्दीतील गाव, पाड्यात २८ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे.

केंद्र सरकारच्या माध्यमातून घरोघरी नळ पाणीपुरवठा यावा, यासाठी जलजीवन मिशन अभियान राबविण्यात सुरू करण्यात आले. स्वच्छ आणि शुद्ध मुबलक पाणीपुरवठा घरोघरी व्हावा, हा या योजनेमागचा मूळ उद्देश होता.

**७२० योजनांपैकी १६९ योजना पूर्ण**

ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी २०१९ मध्ये जल जीवन मिशन अभियान सुरू करण्यात आले. त्या वेळेस ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील २९ गावांमध्ये २ लाख ३४ हजार ६१२ कुटुंबे यांची नोंद करण्यात आली होती मात्र त्यापैकी ६६ हजार ७५ कुटुंबांना घरगुती नळजोडणी देण्यात आली होती. ठाणे जिल्ह्यात जल जीवन मिशनच्या ७२० योजना घेण्यात आल्या असून त्यापैकी १६९ योजना पूर्ण झाल्या आहेत. कामांची मुदत संपली तरी या योजनेखाली कामे कासव गतीने सुरू आहेत. मागील वर्षभर ठेकेदारांना कामाची बिले मिळत नसल्याने करण्यात आलेल्या कामाच्या दर्जाबाबत शंका व्यक्त करण्यात येत आहे.

**पाणीटंचाई, टँकरमुक्ती केवळ कागदावरच**

प्रतिमाणसी किमान ५५ लिटर पाणी नागरिकांना उपलब्ध करून द्यायचे आहे. यासाठी करोडो रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. २०२४ पर्यंत या अभियानातील सर्व कामे पूर्ण होणे अपेक्षित होते. पण ठेकेदारांची अकार्यक्षमता, तांत्रिक अडचणी, भ्रष्टाचाराचे आरोप आणि स्थानिक राजकारण या कारणामुळे यामुळे या योजनेच्या मूळ उद्दिष्टालाच धक्का बसला आहे. अनेक योजनांवर आजपर्यंत करोडो रुपयांचा निधी खर्च करून देखील उन्हाळ्यात जिल्ह्याची पाणीटंचाई संपत नसून टँकरमुक्ती कधी होणार हा प्रश्न कायम आहे.

## ७ कोटी ७५ लाखांची महापालिकेची शाळा धूळखात

**■नवी मुंबई :** नेरूळ सेक्टर ३० येथे नवी मुंबई मनपाने सुमारे ७ कोटी ७५ लाख खर्च करून महानगरपालिकेने सुसज्ज अशी शाळा बांधली आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून उभी केलेली ही इमारत विद्यार्थ्यांविना धूळखात पडून आहे. या प्रकरणी शिवसेना (उबाठा) उपशहर प्रमुख यांनी आयुक्तांना शाळा सुरू करावी, असे निवेदन दिले असून शाळा जून मध्ये सुरू न केल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलन केले जाईल, असा इशारा दिला आहे. नेरूळ सेक्टर ३० येथील भूखंड क्रमांक ८अ ए येथे भव्य शाळा इमारत बांधण्यात आली आहे. शिक्षण विभागाकडे इमारत सुपूर्द करण्यात आली आहे. मात्र गेले अनेक महिने ही इमारत धूळखात पडून आहे. सुमारे ७ कोटी ७५ लाख खर्च करून महानगरपालिकेने सुसज्ज अशी शाळा बांधली आहे. या शाळेचे काम पूर्ण झाले असून अभियांत्रिकी विभागाने या इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करून घेऊन ही इमारत ११ नोव्हेंबर २०२४ रोजी



मालमत्ता विभागास हस्तांतरित केली.

मालमत्ता विभागाने त्यांच्या विभागाची कार्यपूर्तता करून ३० जानेवारीला शिक्षण विभागाकडे हस्तांतरित करत असल्याचे पत्र दिल्याचा दावा शिवसेना (उबाठा) उपशहर प्रमुख समीर बागवान यांनी केला आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या सेक्टर-५० येथील शाळाक्रमांक ९३ या शाळेमध्ये सीबीएससी शिक्षण पद्धतीनुसार बालवाडी ते इयत्ता आठवीपर्यंत प्रवेश प्रक्रियेसाठी ५२५ पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले होते, यातील ५०० पेक्षा अधिक विद्यार्थी प्रतीक्षा यादीत आहेत. एकीकडे एवढी मोठी प्रतीक्षा यादी आहे, जी शाळा आहे त्यात जागा कमी पडत आहे, तर दुसरीकडे शाळा इमारत उभी असून सर्व व्यवस्था असताना शाळा सुरू केली जात नाही. त्यामुळे प्रतीक्षा यादीतील मुलांवर अन्याय होत असल्याची प्रतिक्रिया अनेक पालकांनी व्यक्त केली आहे.

"कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेली इमारत धूळखात पडून आहे. ही शाळा लवकरात लवकर सुरू करावी. आम्ही आयुक्त यांना निवेदन दिले आहे. जर शाळा सुरू झाली नाही, गरजू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाईल तसे झाले तर शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल."

**- समीर बागवान, उपशहर प्रमुख-शिवसेना**

"तांत्रिक बाब पूर्ण करून शाळा सुरू करण्यास किमान सहा महिन्यांचा कालावधी लागेल. आम्ही लवकरात लवकर शाळा सुरू करण्याचा प्रयत्न करीत आहोत."

**- संघमित्रा खिलारे, उपायुक्त शिक्षण विभाग**

## महापालिकेच्या शाळांवर आता सीसीटीव्हीचा वॉच
# १२९ शाळेत ९५० सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार

**■ठाणे :** ठाणे महानगरपालिका शाळांमधील बालसुरक्षा अधिक सक्षम करण्यासाठी महापालिकेने आता शाळांना सीसीटीव्हीचे सुरक्षा कवच बसवण्याचा निर्णय घेतला असून ९५० सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहेत.

ठाणे महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांची त्यातही विद्यार्थीनींची सुरक्षा करण्यासाठी महापालिकेने महत्त्वाची पावले उचलली आहेत. त्यानुसार आता महापालिकांच्या १२९ शाळांमध्ये ९५० सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहेत. त्या संदभार्तील निविदा महापालिकेने काढली



आहे. यासाठी सुमारे अडीच कोटींचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे.

बदलापूर येथील शाळेत घडलेल्या प्रकारानंतर शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. तसेच शाळेत सीसीटीव्हींचे जाळे नसल्याचा मुद्दा देखील चचेर्ला आला होता. ठाणे महापालिकेच्या माध्यमातून यापूर्वी २६० सीसीटीव्ही कॅमेरे शाळेत बसविण्यात आले आहेत. परंतु ते कॅमेरे हे शाळेच्या एन्ट्री आणि एक्सीट पॉईंटवर बसविण्यात आलेले आहेत. ठाणे महापालिकेच्या ७७ इमारतींमध्ये १०६ प्राथमिक आणि २३ माध्यमिक अशा एकूण १२९ शाळा असून त्याठिकाणी २८ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यानुसार आता या विद्यार्थ्यांवर आता सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा वॉच ठेवला जाणार आहे.

शालेय विद्यार्थ्यांच्या बाबतीत घडणाऱ्या चुकीच्या घटनांबाबत राज्य सरकाराने पावले उचलली आहेत. त्यामाध्यमातून शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. याचाच एक भाग म्हणून आता ठाणे महापालिकेच्या शिक्षण विभागाने शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. १२९ शाळांमध्ये आता ९५० कॅमेरे बसविले जाणार आहेत. या कॅमेऱ्यांचे नियंत्रण हे शाळेतील मुख्याध्यांपकांच्या ताब्यात ठेवले जाणार आहे.

## पालघरमध्ये सासऱ्याने केली जावयाची हत्या... गाढ झोपेत असताना कुऱ्हाडीने केले वार

**■पालघर :** महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. पैशाच्या वादावरून ७५ वर्षीय वृद्धाने आपल्या जावयाची कुऱ्हाडीने हत्या केल्याची घटना समोर आली आहे. हत्या केल्यानंतर आरोपी पळून गेला असल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने एका वृत्तसंस्थेला दिली आहे. ही घटना वाडा परिसरात सोमवार आणि मंगळवारच्या रात्री घडली आहे.

४२ वर्षीय मृत व्यक्ती लोकांना नोकरी देण्याचे आश्वासन देऊन पैसे घेत होता. पण तो कधीही तो नोकरी देण्याचे काम



पूर्ण करत नव्हता. अशाच प्रकारे मृत व्यक्तीने त्याच्या सासऱ्यांकडून देखील पैसे घेतले होते. याच पैशावरून दोघांमध्ये अनेकदा वाद देखील झाला. अनेकदा भांडणे देखील झाल्याची माहिती वाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे यांनी दिली.

मृत व्यक्तीच्या नातेवाईकांनी आरोपीच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी मंगळवारी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३ (१) खून अंतर्गत एफआयआर नोंदवला आहे. परंतु, अद्याप आरोपीला अटक करण्यात आलेली नाही. पोलिसांनी आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे पथक तैनात केले आहे. लवकरच आरोपीला अटक होईल असं अधिकाऱ्याने सांगितले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पालघर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी वाढली आहे.

**नेमकं काय घडलं?**

दोन महिन्यापूर्वी दोघांमध्ये पैशावरून वाद झाला. दोघांमध्ये मोठ्या प्रमाणात भांडण देखील झालं. त्यानंतर आरोपीने त्याच्या जावयावर विळ्याने हल्ला केला होता. हल्ल्यानंतर पोलिसात गुन्हा देखील दाखल करण्यात आला होता. मात्र, सोमवार-मंगळवारच्या रात्री आरोपी हा जावयाच्या घरी पोहोचला. त्यावेळी घरी जावई गाढ झोपेत असतानाच आरोपीने त्याच्यावर कुऱ्हाडीने हल्ला केला आणि तेथून लगेच पळ काढला. त्यानंतर या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सध्या पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवला आहे. सध्या पोलीस आरोपी सासऱ्याचा शोध घेत आहेत.

## आंबिवलीत वृध्देची हत्या करणारा चांद अटकेत

**■कल्याण :** मोमाज व्यवसाय सुरू करण्यासाठी पैशांची गरज होती. ही गरज भागविण्यासाठी आंबिवलीतील चांद उर्फ अकबर महम्मद शेख (३०, रा. संतोषीमाता नगर, नवनाथ कॉलनी, आंबिवली) याने गेल्या महिन्यात गळ्यात सोन्याचा ऐवज असलेल्या आंबिवली अटाळी भागातील रंजना चंद्रकांत पाटेकर (६०) या वृध्देची हत्या केली होती. खडकपाडा पोलिसांनी कौशल्याने तपास करून सराईत गुन्हेगार चांदला अटक केली आहे. त्याच्याकडून चोरीचा सोन्याचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

कोळसेवाडी पोलीस ठाण्यातील दाखल गुन्ह्यात चांद आरोपी होता. तो आधारवाडी कारागृहात होता. आठ महिन्यापूर्वीच तो तुरुंगातून सुटून बाहेर आला होता. तो मानेगाव आंबिवली येथे राहण्यास आला होता. चांद तुरुंगातून बाहेर आल्यावर त्याच्यामधील गुन्हेगारीवृत्तीने पुन्हा डोके वर काढले होते. त्याला मोमाज विक्रीचा व्यवसाय सुरू करायचा होता. यासाठी त्याला पैशाची गरज होती.

आंबिवली अटाळीत खापरी पाडा भागात सिध्दीविनायक चाळीत राहणाऱ्या रंजना चंद्रकांत पाटेकर यांची हत्या करण्याचा निर्णय त्याने घेतला होता. रंजना यांच्या गळ्यात सोन्याचा ऐवज होता. हा ऐवज चोरून तो विकून मिळणाऱ्या पैशातून मोमाज व्यवसाय सुरू करण्याची आखणी चांदने केली होती. चांदने रंजना यांच्या घरावर अनेक दिवस पाळत ठेवली होती.

गेल्या महिन्यात संध्याकाळच्या वेळेत रंजना घरात एकट्या होत्या. त्यावेळी चांद त्यांच्या घरासमोर गेला. पिण्यासाठी पाणी मागितले. रंजना घरात पाणी आणण्यासाठी जाताच चांदने त्यांच्या घरात प्रवेश केला. घरातील दूरचित्रवाणीचा आवाज मोठा केला. आतून दरवाजा बंद केला. पाणी घेऊन येत असलेल्या रंजना यांना घट्ट पकडून त्यांचे तोंड हाताने दाबून ठेवले. प्रतिकार करण्यासाठी वाव नसल्याने रंजना यांचे तोंड जमिनीवर आपटून, गळा दाबून चांदने त्यांना जीवे ठार मारले. त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र, कानातील सोन्याची कर्णफुले घेऊन चांद फरार झाला होता. एक लाखाहून अधिक किमतीचा हा ऐवज होता.

रंजना यांच्या नातेवाईकांना हा प्रकार समजताच त्यांचे नातेवाईक हर्षल पाटकर तात्काळ घटनास्थळी आले. या हत्येचे कोणतेही धागेदोरे पोलिसांकडे नव्हते. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी चांदला तपासासाठी ताब्यात घेतले. कसून चौकशी केल्यावर त्याने रंजना पाटेकर यांच्या हत्येची कबुली पोलिसांना दिली. त्याला खडकपाडा पोलीस ठाण्यातील कोठडीत ठेवण्यात आले आहे.

उपायुक्त अतुल झेंडे, साहाय्यक आयुक्त कल्याणजी घेटे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अमरनाथ वाघमोडे, पोलीस निरीक्षक संदीप शिवले, साहाय्यक पोलीस निरीक्षक विजय गायकवाड, अनिल गायकवाड, उपनिरीक्षक अर्जुन दांडेगावकर, सुधीर पाटील, हवालदार राजु लोखंडे, योगेश बुधकर, कुंदन भामरे, संदीप भोईर, किरण शिर्के, विनोद कामडी, ज्योती देसले, संजय चव्हाण, महेश बगाड, ललित शिंदे, राहुल शिंदे, अविनाश पाटील, अनंता देसले, सुरज खंडाळे, मनोहर भोईर, धनराज तरे यांच्या पथकाने अटकेची कारवाई केली.

## नायजेरियावरून आला, साऊथ चित्रपटांमध्ये खलनायक बनला, घराची झडती घेताच पोलीस हादरले

**■ठाणे :** मुंबई आणि उपनगरांमध्ये गुन्हेगारीच्या घटना सुरूच आहेत. आमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली आहे, मात्र तरी देखील अशा प्रकरणाला अजूनही पूर्णपणे आळा बसला नसल्याचं चित्र आहे. अमली पदार्थांची तस्करी सुरूच आहे. वसईमध्ये गुन्हे शाखेकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. तब्बल ११ कोटी ५८ लाख रुपयांचं मेफेड्रॉन ड्रग्स जप्त करण्यात आलं आहे, या घटनेनं खळबळ उडाली आहे.

घटनेबाबत अधिक माहिती अशी की, वसईच्या गुन्हे शाखा युनिट २ ने एका नायजेरीयन नागरीकाकडून तब्बल २२ किलो ८६५ ग्रॅम वजनाचे मेफेड्रॉन ड्रग्स आणि ४८ ग्रॅम कोकेन असा ११ कोटी ५८ लाखांचा अंमली पदार्थांचा साठा जप्त केला आहे. या प्रकरणात अटक करण्यात आलेला आरोपी हा चित्रपटांमध्ये देखील काम करत असल्याचं समोर आलं आहे. त्याने काही हिंदी सिरिअल आणि चित्रपटांमध्ये तसेच काही साऊथ चित्रपटांमध्ये छोटीशी

**घटनेनं खळबळ**

या घटनेनं खळबळ उडाली आहे, पोलिसांनी तब्बल २२ किलो ८६५ ग्रॅम वजनाचे एम.डी. ड्रग्स जप्त केलं आहे, ज्याची किंमत कोट्यवधी रुपयांच्या घरात आहे.

खलनायकाची भूमिका केल्याची माहिती समोर येत आहे.

५ एप्रिल रोजी रात्री १२.१० वाजता वसईच्या गुन्हे शाखा २ च्या युनिटला एव्हरशाईन सिटी येथे व्हिक्टर नावाच्या परदेशी नागरीकाकडे ड्रग्स असल्याची माहिती मिळाली होती. मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी त्यांच्या घरावर छापा टाकला. त्यांच्या घराची झडती घेण्यात आली.

गुन्हे शाखा २ च्या युनिटने त्याच्या घरची झडती घेतल्यावर, त्याच्या घरी ४८ ग्रॅम वजनाचे कोकेन मिळून आले. त्याचसोबत वरच्या रुमची चावी ही त्याच्या रुममधून पोलिसांना मिळाली. त्या घराची झडती घेतल्यावर तीथे पोलिसांना तब्बल २२ किलो ८६५ ग्रॅम वजनाचे एम.डी. ड्रग्स मिळालं आहे, तसेच ड्रग्स बनवण्यासाठी वापरण्यात येणारं केमिकल देखील मिळून आलं, आहे. या प्रकरणात अधिक तपास सुरू आहे, या प्रकरणात आणखी कोणी आहे का? याचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.




## नर्सिंग अभ्यासक्रमाच्या नावाखाली विद्यार्थ्यांची फसवणूक, ठाणे स्थानक परिसरातील संस्थेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल

**■ठाणे :** नर्सिंग (परिचारिका) अभ्यासक्रमाच्या नावाखाली २३ विद्यार्थ्यांची ३३ लाख १७ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. अभ्यासक्रमानंतर विद्यार्थ्यांना निकालपत्र दिली नाही. तसेच विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्र देखील परत केलेली नाहीत. याप्रकरणी उडाण स्कील इन्स्टिट्यूट या संस्थेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

ठाणे रेल्वे स्थानक परिसरातील एका इमारतीमध्ये २०२१ मध्ये उडाण स्कील इन्स्टिट्यूट ही संस्था सुरू होती. या संस्थेचे मालक राहुल झा, सौरभ सांदिलिया यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल आहे. विद्यार्थ्यांनी नौपाडा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, इयत्ता १२ वीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थांनी विविध अभ्यासक्रमासाठी शोध सुरु केला होता. त्यावेळी त्यांना समाजमाध्यमावर उडाण स्कील इन्स्टिट्यूट या संस्थेची जाहिरात दिसली. अनेकांनी या संस्थेत परिचारिका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला होता. हा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असल्याचे भासवून विद्यार्थ्यांकडून संस्थेने लाखो रुपयांचे शैक्षणिक शुल्क घेतले होते. या अभ्यासक्रमात सरकारी प्रमाणपत्र दिले जाते असे ही सांगितले होते.

प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांचे १० वी आणि १२ वी इयत्ता उत्तीर्णचे प्रमाणपत्र, गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला संस्थेने स्वतःकडे ठेवले होते. मे २०२४ मध्ये विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाची परिक्षा दिली. या परिक्षेचा निकाल डिसेंबर २०२४ मध्ये लागणार असल्याचे सांगितले होते. डिसेंबर महिन्यात विद्यार्थ्यांना परिक्षेचा निकाल हाती मिळाला नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी याबाबत संस्थेच्या अधिकाऱ्यांना विचारले असता, त्यांनी महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल नोदंणीसाठी २० हजार रुपये लागतील असे सांगितले. त्यामुळे काही विद्यार्थ्यांनी २० हजार रुपये संस्थेतील अधिकारी सौरभ याच्या बँक खात्यात जमा केले. परंतु त्यानंतरही विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळाले नाही. याबबत विद्यार्थ्यांनी संस्थेच्या अधिकाऱ्यांना विचारले असता, त्यांनी उडवा-उडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली.

फसवणूक होत असल्याने काही विद्यार्थ्यांनी संस्थेच्या कार्यालयात जाऊन विचारणा करण्याचा निर्णय घेतला. परंतु संस्थेला टाळे लागले होते. विद्यार्थ्यांनी संस्थेतील अधिकारी सौरभ सांदिलिया याला संपर्क साधला. त्याचा मोबाईल क्रमांक बंद होता. त्यानंतर त्यांनी संस्थेचा मालक राहुल झा याला संपर्क केला. परंतु त्याचाही मोबाईल क्रमांक बंद होता. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर विद्यार्थ्यांनी याप्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. आतापर्यंत २३ विद्यार्थ्यांनी तक्रार दाखल केली असून त्यांची ३३ लाख १७ हजार ८५० रुपयांना फसवणूक झाल्याचे समोर आले आहे.




## डोंबिवलीत तीन जणांकडून शेअर गुंतवणुकीत एक कोटीहून अधिक रकमेची फसवणूक... २ अटकेत, एकाचा शोध सुरू

डोंबिवली पूर्वेतील ठाकुर्ली उड्डाण पुलाजवळील एका सोसायटीत ग्रोथअप इंडिया आणि अर्थयुक्ती कन्सलटिंग नावाने एजन्सी सुरू करून या माध्यमातून गुंतवणूकदारांना शेअर गुंतवणुकीचे मार्गदर्शन आणि शेअर बाजारात गुंतवणूक करून वाढीव परताव्याचे आमिष तीन जणांनी दाखविले. या माध्यमातून एक कोटी २३ लाखाची गुंतवणूक स्वीकारून गुंतवणूकदारांना विहित वेळेत त्यांचा परतावा दिला नाही. आपली फसवणूक झाल्यावर गुंतवणुकदारांनी रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून ग्रोथअप इंडिया आणि अर्थयुक्ती कन्सलटिंगचे संदीप जोशी (३६) आणि संकेत जोशी (४५) यांना अटक केली आहे. पोलिसांनी त्यांना कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यांना ११ मार्चपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. याप्रकरणातील तिसरा गुंतवणूक सल्लागार अनिकेत मुजुमदार यांचा पोलीस शोध घेत आहेत.

डोंबिवली पूर्वेतील स. वा. जोशी शाळेच्या बाजुला असलेल्या एका सोसायटीत या दोन्ही गुंतवणूकदार संस्थांची कार्यालये होती. या कार्यालयांभोवती शेअर बाजाराचे प्रशिक्षण देणारी फलकबाजी करण्यात आली होती, असे पोलिसांनी सांगितले.

पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी माध्यमांना सांगितले, डोंबिवलीतील संदीप, संकेत जोशी आणि अनिकेत मुजुमदार यांनी शेअर बाजारात गुंतवणूकविषयक मार्गदर्शन वर्ग सुरू केले होते. आणि शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास १० टक्के परताव्याचे आमिष दाखवून मार्गदर्शन वर्गात येणाऱ्या विद्यार्थी, नागरिकांकडून दहा टक्के परताव्याचे आमिष दाखवून गुंतवणूक स्वीकारली होती. गुंतवणूकदारांना ठरलेल्या वेळेत ग्रोथअप आणि अर्थयुक्त एजन्सीच्या सल्लागारांनी गुंतवणुकीवरचा दहा टक्के परतावा देणे अपेक्षित होते. वारंवार तगादा लावूनही तिन्ही गुंतवणूकदार विद्यार्थ्यांना वाढीव परतावा देण्यावरून उडवाउडवीची उत्तरे, टाळाटाळ करत होते. तिघेजण आपली फसवणूक करत आहेत याची जाणीव झाल्यावर गुंतवणूक केलेल्या दहा जणांनी रामनगर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार केली. पोलिसांना गुंतवणूकदारांनी सर्व प्रकारची सबळ माहिती उपलब्ध करून दिली. रामनगर पोलिसांनी तात्काळ गुंतवणूकदार मोहन सावंत यांच्या तक्रारीवरून संदीप जोशी, संकेत जोशी आणि अविनाश मुजुमदार यांच्या विरुध्द तक्रार केली. पोलिसांनी संदीप आणि संकेत जोशी यांना तात्काळ अटक केली. मुजुमदारचा शोध पोलीस घेत आहेत. ही तक्रार दाखल होताच इतर गुंतवणूकदारांनी या तिघांविरुध्द रामनगर पोलीस ठाण्यात तक्रारी केल्या, असे उपायुक्त झेंडे यांनी सांगितले.

हा गुंतवणुकीचा आकडा वाढू शकतो, अशी शक्यता उपायुक्तांनी वर्तवली. वाढीव परतव्याचे आमिष दाखवून कोणी गुंतवणूक करण्यास सांगत असेल तर त्या आमिषाला बळी पडू नका. कोणी फसवणूक करत असल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याला कळवा, असे आवाहन पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी नागरिकांना केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १03, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com